
मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया
## (मराठी)

अंक ११ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • नोव्हेंबर - २०१९



## बाल दिन

# हसती दुनिया (मराठी)

अंक ११ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • नोव्हेंबर २०१९

बालकांच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)



संपादक
राजेंद्र थोरात (अवैतनिक) • सहसंपादक सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
संजय तु. जालगांवकर • आतिश चं. शिंदे
राजनंदन कृ. पिंपळकर • श्रीकांत द. पाटील



संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेस-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४. येथे प्रकाशित केली.



कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org



लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही


| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |


मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९








## स्तंभ


- दोन शब्द ०४
- दादाला विचारु या १०
- विचारपुष्प १२
- शब्दकोडे १४
- आरोग्याचा मंत्र २३
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- हसा मुलांनो हसा ३२
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे ३३
- दिव्यवाणी ३६
- सामान्य ज्ञान ४८
- चित्र काढा आणि रंग भरा ५०



## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- व्यक्तिविशेष - भिलारे गुरुजी ०७
- स्वातंत्र्यसेनानी कृषिसंशोधक - डॉ. खानखोजे १५
- विशेष -इकॉनॉमिक सोशल कौन्सिल आणि तिचे कार्य २०
- दुर्गभ्रमंती २८
- समर्थ दर्शन -६१ ३४
- तेजस्विनी ३७
- आपले जिल्हे - सातारा ४६
- पक्षी जगत - मेगापॉड ४९


## कथा


- शत्रुघ्न आयोध्येत परतला ०५
- परिस्थितीची जाण ०६
- खरा जगजेत्ता ८
- परीक्षा २१
- विद्वत्तेचा गर्व नसावा ४२
- राजा विचित्रसेन ४४








## कविता


- हसती दुनिया २२
- गुण प्राण्यांचे ४५

# दैवी सद्गुणांचा सुगंध

सुगंधी फुलं कुठेही ठेवली, तरी ती सुगंधच पसरवतात. तशी सद्गुणी माणसं कुठेही गेली, तरी ती आपले सद्गुणच पेरत असतात.

एकदा गुरु नानकदेवजी महाराज बाला आणि मर्दाना या आपल्या दोन शिष्यांसोबत पश्चिम बंगालच्या यात्रेवर निघाले होते. वाटेत त्यांना एक गाव लागले. रात्र इथंच घालवावी व दुसऱ्या दिवशी सकाळी पुढे जावे असे ठरवून ते एका झाडाखाली पारावर थांबले. दिवसभर चालून थकल्यामुळे त्यांना भूकही लागली होती. त्या गावात कुठे निवारा मिळेल का, म्हणून चौकशी केली; पण कोणीही त्यांना थारा दिला नाही. उलट त्यांना वाईट-साईट बोलून हाकलून दिले. ती रात्र त्यांनी उपाशीपोटी पारावरच घालवली. सकाळी उठल्यावर गुरु नानक देवांनी ईश्वराचे आभार मानत गावकऱ्यांसाठी आशीर्वाद मागितला, हे प्रभो ! या गावातील लोक याच गावात राहून आनंदाने नांदोत. पुढे मजल-दरमजल करत ते दुसऱ्या गावात पोहचले. दुपारची वेळ झाली होती. ऊन्हाचा तडाखा आणि पोटातील भूक वाढली होती. ते एका झाडाखाली थांबले असताना काही गावकरी तेथे गोळा झाले. त्यांनी नानकदेवांचे तेज पाहून त्यांची विचारपूस केली. त्यांना भोजन आणि पाणी दिले. त्या दिवशी त्यांना तिथेच रहायला भाग पाडले. रात्री त्यांनी गावकऱ्यांशी ज्ञानचर्चा केली व सर्वांना आशीर्वाद दिले.


दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर ईश्वराचे आभार मानत गुरुदेवांनी गावकऱ्यांसाठी आशीर्वाद मागितला, हे प्रभो ! या गावातील लोक हे गाव सोडून वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन राहोत.

गुरुदेवांनी पहिल्या गावातील दुराचारी लोकांसाठी आशीर्वाद मागितला, की ते याच गावात सुखाने राहोत आणि या सदाचारी लोकांसाठी मात्र इतरत्र जाऊन रहावे असा आशीर्वाद का मागितला ? हा प्रश्न मर्दानाला पडला. त्याने गुरुदेवांना या बाबत विचारले असता गुरुदेव नानकदेवजी म्हणाले, पहिल्या गावातील लोक उद्धट, स्वार्थी आणि दुराचारी होते. ते कुठेही गेले तरी दुर्गुणच पसरवतील; परंतु दुसऱ्या गावातील लोक मात्र सदाचारी होते, ते कुठेही गेले तरी सद्गुणच पसरवतील आणि आज समाजात अशाच लोकांची गरज आहे त्यामुळे असे सदाचारी लोक एकाच ठिकाणी न रहाता ठिकठिकाणी राहिले तर तेथील लोकही सद्गुणी होतील.

आज वर्तमान सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज ब्रह्मज्ञानाचा बोध करुन जिज्ञासुंना संत-भक्त श्रेणीत आणत आहेत. जेणेकरुन हे ज्ञानी सज्जन आपापल्या परिसरातील गावात ज्ञानाचा प्रचार-प्रसार करुन अज्ञान-अंधश्रध्दा दूर करतील व आपसात प्रेम-बंधूभाव निर्माण करतील. याचसाठी विशाल संत समागमांचं आयोजन होत असतं. अशा संत समागमाचा हिस्सा होऊन हा दैवी सद्गुणांचा सुगंध आपणही प्राप्त करायला हवा, नाही का ?

- राजेंद्र थोरात

# शत्रुघ्न आयोध्येत परतला



बारा वर्षेपर्यंत राज्यशकट चालवून शत्रुघ्नाने मधुरापुरीला देवपुरीचे वैभव प्राप्त करुन दिले. मग काही निवडक रथ व निवडक जेष्ठ नगरवासी समवेत घेऊन शत्रुघ्न श्रीरामांच्या भेटीसाठी अयोध्यानगरीला निघाला. येताना त्याने वाल्मिकीऋषींच्या आश्रमात मुक्काम केला. आश्रमाचा पाहुणचार व अगत्य यांचा स्वीकार केला. लवणासुराला मारल्याबद्दल मुनिवर वाल्मिकींनी शत्रुघ्नाचे मोठे कौतुक केले. शत्रुघ्न आश्रमात भोजन करीत असताना सुरेल कंठातून गायिले गेलेले श्रीरामांचे चरित्र त्याच्या कानी पडले. आधीच ते काव्यबध्द करण्यात आले होते. त्या काव्यगायनाला वीणेच्या लयीची साथ होती. श्रीरामचरित्राचा यथार्थरुपाने परिचय करुन देणारे ते अद्‌भुत काव्यगायन ऐकल्यावर शत्रुघ्नाच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या.

ती रात्र आश्रमात काढून दुसऱ्या दिवशी त्याने महर्षी वाल्मिकींचा निरोप घेतला व श्रीरामांच्या भेटीसाठी प्रस्थान केले. श्रीरामचरित्राचे गायन रात्री कोण करीत होते, याचे कुतूहल हे कुतूहलच राहिले.

श्रीरामांच्या भेटीसाठी शत्रुघ्न मग अयोध्येस आला. राजमहालात गेल्यावर जेव्हा समोर श्रीरामांना त्याने पाहिले, तेव्हा त्याचा आनंद त्याच्या डोळ्यांत मावेना. त्याने श्रीरामांना प्रणाम केला आणि हात जोडून तो म्हणाला,

"बंधुश्रेष्ठ, तुमच्या अनुज्ञेप्रमाणे मी सारी कामे पार पाडली. लवणासुराचा वध झाला. पुरीही वसली, परंतु रघुनंदना, तुमच्या दर्शनाशिवाय ही बारा वर्षे निघून गेली. आता अधिक काळपर्यंत तुमच्यापासून दूर राहण्याचं साहस माझ्या अंगी नाही. ज्याप्रमाणे बालक आपल्या आईपासून दूर राहू शकत नाही, त्याप्रमाणे मी आपल्यापासून दूर राहू शकत नाही. तरी मजवर कृपा करावी." परंतु श्रीरामांनी शत्रुघ्नाची समजूत घातली व म्हटले, "रघुकुलभूषणा, दुःख करु नकोस. भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ आहे. क्षत्रियाला व राजाला त्याचे राजशकट उत्तम प्रकारे चालविणे अधिक महत्त्वाचे आहे. मलादेखील तू प्राणाहून अधिक प्रिय आहेस. परंतु नरश्रेष्ठा, असा भावविवश विचार करुन कसे चालेल?... तरीही आल्यासारखा तू एक आठवडा मजजवळ राहा. सेवक, सेना व स्वाऱ्यांसह नंतर मधुरापुरीला जा." शत्रुघ्न मग आठवडाभर अयोध्येत राहिला. नंतर श्रीराम, भरत, लक्ष्मण तसेच सर्व मातांचा व अयोध्यावासियांचा प्रेमळ निरोप घेऊन परत मधुरापुरीला निघून गेला.

क्रमशः...



कथा

# परिस्थितीची जाण

शशांक एक हुशार मुलगा होता. आईवडील आणि एक लहान बहीण असा त्याचा परिवार होता. थोडे सधन असल्यामुळे ते एका अलीशान घरामध्ये राहात होते. शशांक एकुलता एक असल्यामुळे आईबाबा त्याचे खूप लाड करायचे. आईवडील धार्मिकवृत्तीचे होते त्यामुळे ते सुसंस्कृत होते. जरी आपण मोठ्या घरात राहात असलो तरी त्याचा त्यांना कधी गर्व नव्हता. शशांकलासुध्दा ते आपल्या बरोबर देवळात घेऊन जात असत. त्यामुळे तोही आईवडिलांच्या आज्ञेबाहेर नसायचा, परंतु श्रीमंत मित्रांच्या सहवासात असल्यामुळे मित्र जसे वागतात तसे वागण्याचा त्याचाही प्रयत्न असे. महागडे कपडे, बूट, घड्याळ, मोबाईल यांसारख्या गोष्टींसाठी तो नेहमी हट्ट करत असे. आता त्याने नवीनच निघालेल्या फोनसाठी हट्ट धरला.

(पान ९ वर)

# भिलारे गुरुजी



महात्मा गांधी यांचे प्राण वाचविणारे, सत्याग्रही, भूदान चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते आणि स्वातंत्र्यानंतर सामाजिक कार्यात झोकून नि:स्वार्थपणे काम करणाऱ्या भिकू दाजी भिलारे ऊर्फ भिलारे गुरुजी यांचा जन्म २८ नोव्हेंबर १९१९ रोजी झाला.

महाबळेश्वर तालुक्यातील भिलार येथे जन्मलेल्या भिलारे गुरुजींनी १९३६ मध्ये सातवी पास झाल्यानंतर शिक्षकाची नोकरी स्वीकारली. महात्मा गांधींनी 'चले जाव' चळवळ सुरु केल्यानंतर आपली नोकरी सोडून भिलारे गुरुजींनी त्यात उडी घेतली. तसेच भिलार परिसरात अनेक भूमिगतांना आसरा देण्याचे काम त्यांनी केले. गांधीजींप्रमाणेच, चक्रवर्ती राजगोपालचारी, सरदार वल्लभभाई पटेल, पंडित नेहरु, सरहद्द गांधी, साने गुरुजी यांचा सहवास त्यांना लाभला. १९४४च्या जुलै महिन्यात महात्मा गांधी पाचगणी मुक्कामी असताना, प्रार्थनेच्या वेळी त्यांच्यावर नथुराम गोडसे, गोपाळ गोडसे, करकरे व आपटे यांनी प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मोठ्या समयसूचकतेने व धैर्याने नथुरामच्या हातातील सुरा हिसकावून घेऊन भिलारे गुरुजींनी बापूंचे प्राण वाचविले. ही घटना पुढे गांधीहत्येचा तपास करणाऱ्या आयोगासमोरही आली होती. स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाबद्दल गुरुजींचा गांधीजींच्या हस्ते सत्कारही झाला होता. भूदान चळवळीत त्यांनी पाचगणीतील दीडशे एकर जमीन विनोबांना एका क्षणात दान दिली. स्वातंत्र्यानंतर त्यांनी सामाजिक कार्याला वाहून घेतले. ग्रामोन्नती संघ, सर्वोदय योजनांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक कामांचा डोंगर उभा केला. त्यांनी महाबळेश्वर, वाई आणि जावळी या तीन तालुक्यांत ९३ गावांचा 'ग्रामोन्नती संघ' स्थापून अनिष्ट रुढी, अंधश्रध्दा आणि अस्पृश्यता निवारणाचे काम केले. १९६२ ते १९८० असे अठरा वर्षे गुरुजी आमदार होते. त्यापैकी बारा वर्षे त्यांनी जावळीचे प्रतिनिधित्व विधानसभेत केले. कोयना धरणाग्रस्तांच्या प्रश्नाला त्यांनी वाचा फोडली. जावळीत त्यांनी सहकार चळवळ सुरु केली. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक, किसन वीर साखर कारखाना, जावळी सहकारी बँक अशा अनेक सहकारी संस्था स्थापन करण्यात त्यांचे योगदान मोठे आहे. ३० नोव्हेंबर १९५७ रोजी प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते झाले. त्या नियोजनात गुरुजींचे योगदान होते. भिलारला आता 'पुस्तकांचे गाव' अशी नवी ओळख मिळाली असली तरी इतकी वर्षे ते गुरुजींचे गाव म्हणून प्रसिध्द होते.

❖❖❖



कथा

# खरा जगजेत्ता

जगजेत्ता अलेक्झांडर डायोजिनसला गुरु मानत असे. त्यांची विशेषता म्हणजे त्यांनी स्वत:साठी काहीही साठवून ठेवले नव्हते. ते पूर्णपणे दिगंबर अवस्थेत राहत आणि समुद्रकिनारी दगडाच्या टबमध्ये बसून दिवसभर चिंतन आणि मनन करीत असत.

अलेक्झांडरने काही वर्षांमध्ये ग्रीस आणि जवळपासचे प्रदेश जिंकून घेतले होते. त्यामुळे त्याला स्वत:चा गर्व वाटू लागला. आता तो जग जिंकायला निघाला होता. त्याने विचार केला जाण्याआधी डायोजिनसचा आशीर्वाद घ्यावा.

सिंकदर त्या ठिकाणी पोहचला जिथे डायोजिनस पाणी भरलेल्या टबमध्ये दिगंबरावस्थेत झोपले होते. त्यांच्याकडे जाऊन सिकंदर म्हणाला, “मी ग्रीसचा राजकुमार सिकंदर आहे. मी संपूर्ण जग जिंकायला चाललो

आहे. माझ्या अभिवादनाचा स्वीकार करावा आणि मी तुमच्यासाठी काय करू शकतो हे सांगावे.''

डायोजिनसने त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. अलेक्झांडरला वाईट वाटले. आजपर्यंत त्याच्याशी कोणीच असे वागले नव्हते. डायोजिनस शांत बसले होते. अलेक्झांडरने पुन्हा एकदा त्यांना सांगितले.

डायोजिनसने झोपल्या झोपल्या एक नजर अलेक्झांडरकडे टाकली आणि म्हणाले,''जरा माझ्यासमोरुन बाजूला हो. ऊन येण्यासाठी तरी जागा ठेव.''

असे ऐकल्यानंतर अलेक्झांडर तिथून उदास चेहऱ्याने महालाकडे परत येताना म्हणाला,''जर मी अलेक्झांडर नसतो तर डायोजिनस असतो. कारण त्यांना कोणाचेच भय नाही. त्यांना कशाचीच चिंता नाही. देहाची पर्वा नाही. ज्या सिकंदरापुढे भले भले वीर उभं राहायला घाबरतात त्याच्याकडे दुर्लक्ष करणारा केवळ डायोजिनस असू शकतो. खरे जगज्जेता तर हेच आहेत.''

❖❖❖




# परिस्थितीची जाण

(पान ६ वरुन)

आईवडील त्याला समजावत होते परंतु तो ऐकण्याच्या स्थितीत नव्हता. वडील कामाला गेल्यानंतर तो आईला सतावत असे. आई कसे तरी त्याला समजावत असे.

त्यांच्या घरी काम करायला येणारी मोलकरीण अचानक चार दिवस आली नाही. त्यामुळे आईला कामातून वेळच मिळत नव्हता. मोलकरीण का येत नाही म्हणून एके दिवशी संध्याकाळी शशांकला बरोबर घेऊन त्याची आई त्या बाईच्या घरी गेली. त्यांच्या घरात पावसाच्या पुराचे पाणी शिरले होते त्यामुळे घरातील सर्व सामान भिजून गेले होते. घरातील सामानाची, कपड्यांची दुरावस्था झाली होती. इतके असूनही तिचा मुलगा बाहेर वळचणीला बसून अभ्यास करत होता. शशांक आणि त्याची आई आलेली पाहून मोलकरणीच्या डोळ्यात अश्रू आले. डोळे पुसतच तिने शशांकच्या आईला बसायला तोडके मोडके स्टूल दिले. ही परिस्थिती बघून शशांकची आईसुध्दा हळहळली. तिने आपल्या जवळ असलेले थोडे पैसे तिच्या हातात ठेवले आणि सांगितले, ''उद्या घरी ये आणि आणखी पैसे घेऊन जा काही काळजी करु नकोस तुला सर्वतोपरी आम्ही मदत करु.''

दोघे आपल्या घरी परत आले. शशांकने हे सर्व दृष्य पाहिलं की अशा कठीण परिस्थितीतसुध्दा मोलकरणीचा मुलगा एका बाजूला बसून अभ्यास करत होता.

❖❖❖

# दादाला विचारु या..!

**प्रश्न** : सद्गुरु आणि परमात्मा यात फरक काय आहे ?

**उत्तर** : सद्गुरु आणि परमात्मा यांच्यात तत्वतः काहीच फरक नाही. सद्गुरु हे निर्गुण निराकार ईश्वराचे साकार स्वरुप आहे. परंतु तरीही एक फार मोठा फरक आहे. सद्गुरुच्या कृपेनेच परमात्म्याचा बोध होतो. सद्गुरु दयाळू असतो तर परमात्मा न्यायी असतो. परंतु एखादी व्यक्ती कितीही दुर्गुणी, कुकर्मी असली आणि ती व्यक्ती सद्गुरुला शरणागत झाली तर सद्गुरु दयाळू होऊन त्या व्यक्तीला सर्व दुष्कर्मातून मुक्त करुन क्षमादान देतो. सद्गुरु युगायुगाला प्रगट होऊन मानवमात्राच्या कल्याणासाठी उपदेश देत असतो. सद्गुरु शरीर रुपात असल्यामुळे मानवीय सुख दुःखांची त्याला जाणीव असते आणि त्यांचे निवारण करण्याची सुध्दा त्याच्यामध्ये क्षमता असते. आज आपल्यासाठी जो वर्तमान काळ आहे तो सद्गुरुसाठी भूतकाळ असतो.

**प्रश्न** : परमात्म्याचं ज्ञान झाल्यानंतर खरे सुख प्राप्त होते, मग ज्ञान होऊनसुध्दा काहीजण गरीब राहतात तर काही जणांना खूप श्रीमंती मिळते असे का ?

**उत्तर** : मनुष्य श्रीमंत असेल तरच सुखी आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल असेल तर गरीब, दुःखी असतो हा मुळात समजच चुकीचा आहे. ज्याला आपण सुख समजतो तेच मुळात मृगजळ आहे. सुख आणि दुःख ह्या मनात निर्माण झालेल्या प्रवृत्ती आहेत. आपल्या 'स्व' स्वरुपाची ओळख पटल्यानंतर सर्व विकारमुक्त होऊन एक निरपेक्षित जीवन जगण्याची क्षमता निर्माण होते. त्याला कोणत्याही प्रकारची अभिलाषा उरत नाही. तो श्रीमंतीने आनंदीत होत नाही. किंवा गरिबी असली तरी दुःखी होत नाही.. धन, वैभव मान सन्मान इत्यादि भौतिक गोष्टी प्रारब्धानुसार प्राप्त होत असतात. त्यामुळे वरकरणी भेद दिसत असला तरी कोणताही ब्रह्मज्ञानी आत्मानंदात स्थिर असल्यामुळे सर्वसामान्यांना भासणाऱ्या भौतिक सुख दुःखाच्या पलीकडे गेलेला असतो.

**प्रश्न** : खरा भक्त कोणाला म्हणता येईल ?

**उत्तर** : ईश्वरभक्ती ही धन-संपत्ती मिळविण्यासाठी, भौतिक सुखासाठी, सत्ता व कीर्ती मिळविण्यासाठी न करता ईश्वरावरील प्रेमाखातर जो करतो तोच खरा भक्त होय. कोणत्याही अपेक्षेने जो ईश्वराची भक्ती करत नाही, तो भक्त ईश्वराला अधिक प्रिय असतो. अशा भक्ताची कर्तव्ये पार पाडण्यासाठी ईश्वर स्वतः सहाय्य करतो.

# ५३ व्या वार्षिक महाराष्ट्र संत समागम

## (जानेवारी २०२०) निमित्त

# ‘प्रेमाभक्ती’ विशेषांक

आगामी ५३ व्या वार्षिक महाराष्ट्र संत समागम निमित्त सद्गुरु माता सुदीक्षाजींच्या कृपाशीर्वादाने मराठी पत्रिका विभागातर्फे समागम विशेषांक प्रकाशित करण्याचा मानस असून ***‘प्रेमाभक्ती’*** या मुख्य शीर्षकावर आधारित खालीलपैकी कोणत्याही एका शीर्षकावर साहित्य/रचना मागवित आहोत.

**प्रेमा भक्ती**

**प्रेमाभक्ती - परमानंदाची अवस्था**

**प्रेमाभक्ती - संपूर्ण समर्पण भाव**

**प्रेमाभक्ती - जीवनाचा श्रृंगार**

**प्रेमाभक्ती - प्रपंच परमार्थरुप करण्यासाठी**

**प्रेमाभक्ती - भक्तीची इतिकर्तव्यता**

**प्रेमाभक्ती - मुक्तीचे साधन**

**प्रेमाभक्ती - भक्त आणि भगवंताचा संगम**

**प्रेमाभक्ती - सद्गुरु प्रति उदात्त भाव**

**प्रेमाभक्ती - आत्मिक सुखाची अनुभूती**

**प्रेमाभक्ती - ज्ञान आणि कर्माचा समन्वय**

**प्रेमाभक्ती - ब्रह्मज्ञानाची फलश्रृती**

**प्रेमाभक्ती - प्रत्यक्ष अनुभूती**

**प्रेमाभक्ती - द्वैताकडून अद्वैताकडे**

### -: सुचना :-

- लेखकांनी आपले लेख जास्तीत जास्त २ ते ३ फुलस्केप पानापर्यंत लिहावेत. मोठी लांबवळ नको.
- आपल्या रचना फुलस्केप पेपरवर कागदाच्या एकाच बाजूस समास सोडून लिहाव्यात.
- शक्यतो आपण आपल्या लिखाणात भावनात्मक विचारांना अभिव्यक्ती द्यावी.
- आपल्या लिखाणात संदर्भासाठी ग्रंथातील उतारा /श्लोक / अभंग किंवा अवतारवाणी पद क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- आपले साहित्य / रचना लिफाफ्यात बंद करुन लिफाफ्यावर ‘समागम विशेषांक सामग्री’ असे लिहून मराठी पत्रिका विभाग, संत निरंकारी सत्संग भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४ येथे पाठवावी. किंवा खालील ई-मेल द्वारे पाठवण्याची कृपा करावी. snm.jadhavca@gmail.com
- आपले साहित्य पाठविताना आपले पूर्ण नाव, पत्ता व फोन नंबर लिहावा. सोबत आपला सध्याचा पासपोर्ट साईज फोटो पाठवावा.
- ‘प्रेमाभक्ती’ विषयाला अनुसरुन उत्कृष्ट व मुद्देसूद साहित्य व रचनांना जास्तीत जास्त प्राध्यान्य दिले जाईल.
- सदर विशेषांकासाठी ज्यांना ‘जाहिराती’ द्यायच्या असतील त्यांनी मराठी पत्रिका विभाग कार्यालयाशी प्रत्यक्ष किंवा दूरध्वनी क्र. ०२२-२४१०२०४७ किंवा ०२२-२४१०५७४९ वर संपर्क साधावा.
- लेख, कविता तसेच जाहिराती जास्तीत जास्त दि. ३० नोव्हेंबर २०१९ पूर्वी पाठवाव्यात. उशीरा आलेल्या लेख, कविता तसेच जाहिरातींचा विचार केला जाणार नाही.



# विचारपुष्प

आपण या सृष्टीवर पाहत आहोत, की वेगवेगळे ऋतु येतात; कधी उष्मा, कधी थंडी, कधी पाऊस तर कधी बर्फवर्षाव! अशाच प्रकारे आपल्या जीवनातही सर्वकाळ सारखा नसतो. सुखाच्या वेळी सुखं येतील आणि जेव्हा दु:ख येणार असेल तेही त्याच्या वेळेला येणार. जर शरीराला काही त्रास होणार असेल, एखादा आजार येणार असेल तर तोही त्या त्या वेळी येणार. जीवनामध्ये आपल्याबाबतीत इतके काही घडणार असेल तर आपण शांत आणि स्थिर राहून जीवनातील कोणत्याही परिस्थितीमध्ये आपले मन आणि व्यवहार यांच्यामध्ये स्थैर्य टिकवून ठेवायचे आहे. हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा आपण या स्थिर असलेल्या निराकार परमात्म्याशी जोडून राहू, जो पूर्वी होता, आजही आहे आणि जो अनंत आहे. हे भौतिक जगत, ही माया, या सर्व वस्तू क्षणभंगुर आहेत, सर्व नाशवान आहेत. तेव्हा आपण सर्व परिस्थितीमध्ये सदोदित या एकरस निराकार प्रभूशी जोडून राहायचे आहे. भले याला आपण अल्लाह, गॉड, वाहेगुरु, राम अशा कोणत्याही नावाने संबोधत असू. हा स्वत: निर्गुण आहे, पानोपानी, कणाकणामध्ये सामावलेला आहे. जेव्हा आपण याचा आधार घेऊन तद्‍रुप होण्याचा प्रयत्न करु तेव्हा जीवनात कशीही स्थिती असली तरी आम्हाला त्यामध्ये सहज आनंदाची अवस्था आणि स्थैर्य लाभेल. जेव्हा आपण स्थिरता प्राप्त करु तेव्हा खऱ्या अर्थाने एका Movement (गतिमानते)कडे अग्रेसर होत आहोत. खरं तर जर या शब्दांकडे बघितले तर Still (स्थिर) आणि Movement (गती) तर ते परस्पर विरोधी भासत आहेत; परंतु जेव्हा आपण या स्थिर प्रभूशी एकरुप होतो, या निरंकाराच्या रंगात रंगून जातो तेव्हा आपण निरंकाररुप होऊन जातो. मानवाच्या शरीरामध्ये ही जी ज्योत आहे ती या निरंकाराचीच ज्योत आहे, या परात्म्याचाच अंश आमच्यामध्ये आहे. तेव्हा आपण म्हणतो तो निरंकारच. जेव्हा याचे गुणही आमच्यामध्ये प्रवेश करतील तेव्हा आपली प्रगतीच्या दिशेने वाटचाल असेल.

ही आनंदाची अवस्था जेव्हा आमच्या जीवनात उतरते तेव्हापासूनच खऱ्या अर्थाने आमचे भक्तीमय जीवन सुरु होते. एकदा आपली खरी ओळख झाली, आपल्या शाश्वत अस्तित्वाचा बोध झाला, म्हणजे कळून चुकते, की आपण केवळ शरीर नाही. हा जो जीवनप्रवास चालू आहे तो


आपण ब्रह्मज्ञानाचा आधार घेऊन करायचा आहे कारण तोच आपला देह पडल्यावर निजघरात घेऊन जाईल. निराकार परमात्मा तर सदोदित सर्वांची झोळी भरत आहे. क्षणोक्षणी प्रत्येकाच्या जीवनात ज्याच्या-त्याच्यासाठी जे सर्वोत्तम आहे तेच घडत आहे. तथापि, निरंकार प्रभू जी दौलत देत आहे ती आपल्या पदरात कशी पाडून घ्यायची हे आमच्यावर अवलंबून आहे. क्षणोक्षणी आपण याला पाहत नसतो तेव्हा आपल्याला वाटते, की जीवनात अजून कृपा होत नाही. मात्र, क्षणोक्षणी निराकाराची कृपा होतच आहे. कृतज्ञतेचा भाव बाळगून आपण ही कृपा जीवनात उतरवायची आहे. कदाचित त्यावेळी आपला दृष्टीकोन फारच संकुचित किंवा सीमित असेल त्यामुळे आपल्याला असे वाटते, की यावेळी असे व्हायला हवे होते; पण निरंकार ते करत नाही, आम्हाला अमूक पाहिजे होते; पण हा देत नाही; आम्हाला वस्तू हव्या होत्या, नोकरी हवी होती, एखादी भौतिक उपाधी हवी होती, मुलं हवी होती, लग्नाला एवढी वर्षे झाली तरी मूल होत नाही.  अशाप्रकारे कितीतरी गोष्टी आहेत ज्या मायावी जगताशी नाते जोडल्याने आमच्या मनात येतात. आपल्याला असे वाटते, की कदाचित परमात्मा कृपा करत नाही, आमच्या अडचणी दूर करत नाही. अशा परिस्थितीतही आपण असेच समजावे, की निराकाराने एखादी वस्तू आपल्याला दिली नाही किंवा एखादी गोष्ट कष्टप्रद दिली असली तरी त्याची आमच्या जीवनात किती आवश्यकता होती हे निराकारालाच ठाऊक आहे. आमची काही कामं रखडली असतील तर ती का रखडली आहेत (असा विचार न करता) परमात्मा जे काही देतो ते पूर्ण असते, कारण तो स्वतः पूर्ण आहे आणि त्याच्याशी जोडलेली प्रत्येक गोष्ट पूर्ण आहे. आपण तक्रार न करता केवळ एक कृतज्ञतेचा भाव धारण करावा. जेव्हा क्षणोक्षणी आपण कृतज्ञतेचा भाव बाळगू तेव्हा हे जीवन किती सहज होत गेले आहे हे पहायला मिळेल. हळू हळू जी दुःखं आहेत ती दूर होत जातील आणि क्षणोक्षणी सुंदरता दिसू लागेल.

जेव्हा ही कृतज्ञतेची भावना आणि प्रेमाची भावना उपजते तेव्हा आपल्या अंतरात निःस्वार्थपणे एक समर्पित भाव उत्पन्न होतो, की हे सुंदर जग आम्हाला मिळाले आहे, आता आपण या जगाला आणखी सुंदर बनविण्यासाठी योगदान द्यावे. आपण स्वतःहून यामध्ये कोणती सुंदरता देऊ शकतो, आमच्या मनामध्ये क्षमाभाव बाळगू, करुणा-दया ठेऊ, हृदय विशाल करुन विशालतेचे प्रमाण देऊ. जेव्हा हे सद्‌गुण आमच्यात उतरतील तेव्हा एक पाऊल पुढे टाकत आपले घर, आपला परिवार, आपला समाज, आपला देश आणि आपल्या जगासाठी 'भिंतीरहित विश्व' आणि विश्वबंधुत्वाची भावना साकार करु शकू. एकत्व आणि सद्‌भाव याविषयी बोलले जाते, की कशाप्रकारे आपण लयबध्द होऊन चालायचे आहे. जसे सत्संगामध्ये एखादे गीत गायले जाते तेव्हा कितीतरी वेगवेगळी वाद्ये वाजतात, हार्मोनियम, तबला, ढोलक इत्यादी सगळी दिसायला वेगवेगळी असली तरी त्यांची चाल मात्र एकसारखी असते. त्यामुळेच त्यामध्ये आपोआप एक Harmony (समरसता) तयार होते. तशाच प्रकारे आपण कोणत्याही देशाचे असू, कसेही दिसत असू, आहार कोणताही असो एकमेकांविषयी दुर्भाव न बाळगता सर्व निरंकार प्रभूचेच अंश आहेत असे मानावे.

❖❖❖

# शब्दकोडे १८४

❍ पूजा अरोडा ( रेवाडी-हरियाणा )




## आडवे शब्द

१. लहान तांब्या किंवा गडू
३. स्वाधीन चा विरुध्द शब्द
६. क्षेत्रफळानुसार भारताचे सगळ्यात लहान राज्य
७. ...... नाही त्याला डर कशाला ? (म्हण)
८. पाचाचा वर्ग
१०. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री ...... चव्हाण हे होते.
१२. कलिंगच्या युध्दानंतर सम्राट ..... या राजाने बौध्दधर्म स्वीकारला
१३.द्यूतक्रीडा हरल्यावर पांडवांना बारा वर्ष ..... भोगावा लागला
१४. महाराष्ट्र राज्याची राजभाषा

## उभे शब्द

२. रवींद्रनाथ .... यांना ‘गीतांजली’ या काव्य संग्रहासाठी नोबेल पारितोषिक मिळाले
४. संत तुलसीदासांनी रचलेला एक महान ग्रंथ
५. हिंदी सिनेमातील अभिनेते सुनील दत्त यांची अभिनेत्री पत्नी : ...... दत्त
७. कुंतीला विवाहपूर्वी सूर्यापासून प्राप्त झालेला पुत्र
९. दहा वर्षांचा काळ
१०. महात्मा गौतम बुध्दांच्या पत्नीचे नाव
११. जेवल्यानंतर करावयाचे एकमेव आसन

उत्तरे इतरत्र

# स्वातंत्र्यसेनानी कृषिसंशोधक - डॉ. खानखोजे



पांडुरंग खानखोजे यांचा जन्म ७ नोव्हेंबर, १८८४ रोजी झाला. त्यांचे वडील सरकारी नोकर. लहानपणी १८९१ मध्ये इंग्रजांविरुध्द भिल्ल सेना उभी करण्यासाठी जंगलात निघाले. मात्र, पोलिसांनी पकडून घरी आणले. पुढील शिक्षणासाठी वर्ध्याहून नागपूरला आले. तेथे पांडुरंगने सहकाऱ्यांच्या मदतीने स्वदेशी वस्तुंचे दुकान काढले. १९०३ मध्ये इंग्लंडच्या युवराजांच्या राज्यभिषेकानिमित्त वाटलेली मिठाई पांडुरंगने फेकून दिली. शाळेतून मग निलंबित करण्यात आले. पांडुरंगचा इंग्रजांबद्दलचा राग वाढला.

सशस्त्र क्रांतीसाठी विविध पर्याय तपासले. अद्ययावत स्फोटकांचे ज्ञान घेणे आवश्यक आहे, असे त्यांचे मत झाले. त्यांनी भारत सोडला. जपानमार्गे ते अमेरिकेला गेले. अमेरिकेत बर्कली येथे ते मित्रासह राहू लागले. हॉटेलमध्ये भांडी घासण्यासह सर्व कामे केली. अर्थार्जन करत करत स्फोटकांचे प्रशिक्षण कसे घेता येईल, याचा शोध ते घेत होते. शेवटी कृषी महाविद्यालयात प्रवेश मिळवला. त्यानंतर लष्करी महाविद्यालयातही प्रवेश मिळाला. दोन्ही पदव्या एकदमच मिळवल्या. मेक्सिकोला दुष्काळी भागात शेती कशी करावी यावर अभ्यास केला. इंग्रजांविरुध्द युवकांना प्रेरित करणाऱ्या 'गदर'च्या मराठी आवृत्तीचे ते संपादक झाले. पशुपालन आणि दुग्धव्यवसायाचे सखोल ज्ञान घेतले. एमएस् ही कृषिशास्त्रातील पदवी घेत यशस्वीपणे स्फोटकांची निर्मिती केली. पुढे प्रेरणादायी लेखन आणि कृषी संशोधनावर लक्ष केंद्रित केले. जमीन आणि पिके, जनुकशास्त्र या विषयावरील अभ्यासाने मेक्सिकोत आदराचे स्थान मिळवले. तेवोसिंतले या रानटी तणाचा मक्यासह संकर घडवून त्यांनी तेवोमका हा मक्याचा नवा वाण बनवला. या मक्याच्या रोपाला तीस-तीस कणसे लागत. मेक्सिकन सरकारने राष्ट्रीय पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

भारत स्वतंत्र झाल्यावर ते भारतात आले. मात्र बोटीतून उतरताच त्यांना अटक झाली. कारण इंग्रजांच्या काळ्या यादीत त्यांचे नाव होते. पुढे त्यांची सुटका झाली. त्यांनी भारतीय कृषी धोरणाविषयी महत्त्वाचे अहवाल दिले.

सीमेवर शेती केल्यास सीमांचे रक्षण होईल, असे त्यांचे म्हणणे होते. सरकारने ही बाब मानली नाही. मातृभूमीच्या सेवेची संधी शोधणाऱ्या या संशोधकाचे १८ जानेवारी १९६७ रोजी निधन झाले.

❖❖❖





# आजोबा


चित्रांकन
लेखन, रंग
अजय कालडा







एके दिवशी तलावाच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या उंदरांची बिळे त्याने आपल्या पायाने बुजवून टाकली.
अरे हत्ती दादा, तू हे काय करत आहेस ?
तू मध्ये येऊ नकोस नाहीतर मी तुला सुध्दा चिरडून टाकीन
सर्व उंदीर घाबरुन आपल्या पुढाऱ्याकडे गेले. त्याला सर्व हकिकत सांगितली. थोडा वेळ विचार करुन तो म्हणाला, घाबरू नका मी याची व्यवस्था करतो.


दुसऱ्या दिवशी सर्व उंदीर आणि त्यांचा पुढारी जंगलाचा राजा सिंहाकडे गेले. आणि म्हणाले, महाराज त्या खोडसाळ हत्तीने आमची घरे बुजवून टाकली, आम्हाला मदत करा.
दुसऱ्या दिवशी जंगलाचा राजा सिंहाने एक सभा आयोजित केली. त्या सभेत सर्व प्राणी हजर झाले. सर्व प्राणी एका बाजूला आणि हत्ती दुसऱ्या बाजूला!
सिंहाने सर्व प्राण्यांना हत्तीच्या खोडसाळपणाबद्दल विचारले, तेव्हा सर्व प्राण्यांनी हत्ती आपल्याला त्रास देत असल्याचे सांगितले.


सर्व प्राण्यांचे ऐकून घेतल्यानंतर सिंहाने आदेश दिला की हत्तीने हे जंगल सोडून निघून जावे.
हत्तीने सर्व प्राण्यांची माफी मागितली आणि या पुढे मी असे कधीच करणार नाही असे वचन देऊन हत्ती जाऊ लागला.
तेवढ्यात एक छोटा उंदीर म्हणाला, हत्ती दादा तुला तुझ्या चुकीची जाणीव झाली म्हणून तुला एक संधी दिली पाहिजे.
जंगलातील सर्व प्राणी त्या छोट्याशा उंदराने दिलेल्या सल्ल्याशी सहमत झाले. सिंहराजाने सुध्दा हत्तीला जंगलात राहण्याची एक संधी दिली. त्या दिवसापासून जंगलातील सर्व प्राणी मिळून मिसळून आनंदात राहू लागले.
तात्पर्य:- एखाद्याला जर आपल्या चुकीची जाणीव झाली तर त्याला आपली चूक सुधारण्याची एक संधी दिली पाहिजे.

# इकॉनॉमिक सोशल कौन्सिल आणि तिचे कार्य

संयुक्त राष्ट्रसंघ जगात शांतता, समृध्दी व स्थिरता कायम राखण्यासाठी काम करणारी संघटना आहे. जगातील १९९ देश राष्ट्रसंघात एका छताखाली नांदतात. त्यामुळे जगातील सर्वात व्यापक, मोठी व परिणामकारक अशी ही संस्था आहे, यात शंका नाही. राष्ट्रसंघाशी निगडित अनेक संस्था विविध प्रकारचे काम करतात. त्यातील सर्वात महत्वाची व तिसऱ्या क्रमांकाची संस्था म्हणून जिचा उल्लेख केला जातो ती संस्था म्हणजे द इकॉनॉमिक सोशल कौन्सिल ही होय. राष्ट्रसंघाच्या स्थापनेवेळीच म्हणजे १९४६ मध्येच इकॉनॉमिक सोशल कौन्सिलची स्थापना करण्यात आली. यावरुनच या संस्थेचे काम व जबाबदारी स्पष्ट होते.

जगण्यासाठी माणसाला आर्थिक स्थैर्याची नितांत गरज असते. अन्न, वस्त्र व निवारा या तीन प्राथमिक गरजा असल्याचे मानले जाते. पण या गरजा पूर्ण करण्यासाठी त्या व्यक्तीकडे किमान थोडे पैसे असावे लागतात. म्हणजेच त्याला आर्थिक स्थैर्य असावे लागते आणि त्याच दिशेने काम करण्यासाठी इकॉनॉमिक सोशल कौन्सिलचे प्रयत्न सातत्याने सुरु असतात. विविध चर्चा, परिसंवाद, अहवाल, अभ्यासदौरे या माध्यमातून इकॉनॉमिक सोशल कौन्सिल जगात परिवर्तन करण्याचे अवघड आव्हान पार पाडत आहे. स्वीडनमध्ये कौन्सिलचे मुख्यालय आहे. जगातील आर्थिक, सामाजिक व पर्यावरणाशी निगडित सर्व बाबींचे निराकरण व त्यावर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी इकॉनॉमिक ही संस्था सातत्याने आग्रही राहते. किंबहुना हेच कौन्सिलचे प्रमुख कामदेखील आहे. राष्ट्रसंघाच्या आमसभेने मिलेनियम गोल म्हणजेच शतकातील ध्येय या नावाने काही गोष्टी करण्याचा दृढसंकल्प केला आहे. तो संकल्प सिध्दीस नेण्यासाठी कौन्सिल सातत्याने प्रयत्न करत आहे.

राष्ट्रसंघाच्या विविध योजना खालपर्यंत पोचविण्यासाठी, त्या योजना व संबंधित देश तसेच संस्थांमध्ये समन्वय राखण्यासाठी इकॉनॉमिक सोशल कौन्सिल कार्यरत असते. विविध देशांतील खासदार, अभ्यासक, तज्ञ, धोरणकर्ते, विविध उद्योगसमूह, सरकारी तसेच निमसरकारी संस्था तसेच एनजीओ यांच्याशी कौन्सिल सतत संपर्कात असते. कौन्सिलशी जगातील तीन हजारांहून अधिक एनजीओ जोडल्या गेलेल्या आहेत.

इकॉनॉमिक सोशल कौन्सिल ही मुद्यांवर आधारित काम करते. त्यामुळे या संस्थेचे काम हे परिणामकारक ठरले आहे. त्यासाठी या संस्थेत दरवर्षी संबंधित देशांतील मंत्र्यांची परिषद आयोजित केली जाते. यात राष्ट्रसंघाचा कार्यक्रम कसा राबवायचा, याचा निर्णय घेतला जातो. या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे काम ही संस्था करते. शाश्वत विकासासाठी जगातील विविध राजकीय नेत्यांना प्रशिक्षण, माहिती देण्याचे कामदेखील या संस्थेमार्फत सातत्याने केले जात आहे. जगातील आर्थिक, सामाजिक दरी दूर करण्यासाठी सर्व ते काही करण्याचा कौन्सिलचा प्रयत्न असतो. त्यामुळे सध्याच्या विकसित, अविकसित व गरीब अशी विभागणी झालेल्या जगात समन्वय साधण्यासाठी इकॉनॉमिक सोशल कौन्सिलसारख्या संस्थांची नितांत गरज आहे.

❖❖❖



कथा

# परीक्षा

बिरबल केव्हा सेवानिवृत्त होतो व आपण केव्हा वजीराचे पद मिळवतो, अशी घाई अकबराच्या दरबारातील सात मानकऱ्यांना झाली होती. ते रोज बादशहाकडे बिरबलाच्या कागाळ्या करु लागले. बादशहा हो हो म्हणून ऐकून घ्यायचा. तरीही ते सात जण बिरबल कोठे चुकतो, तो दरबारात किती उशिरा येतो, बिरबल कसा विक्षिप्त स्वभावाचा आहे वगैरे सांगत असत.

एकदा बादशहा त्या सात जणांना म्हणाला, "तुम्हाला बिरबलाचे पद हवे आहे; पण त्याच्या पदावर कोण राहील याची परीक्षा खुद्द बिरबल घेणार व योग्य उमेदवार तोच मला सांगणार आहे. त्यामुळे त्याच्याबद्दल मला काही सांगू नका."

हे ऐकताच ते सात जण एकमेकांच्या तोंडाकडे बघायला लागले आणि काही वेळाने ते आपसातच भांडत बसले. मीच वजीरपदाला योग्य आहे असे जो तो म्हणत होता. बिरबल हे दृश्य माडीवरुन पाहतच होता.

एकदा बिरबल बादशहाला म्हणाला, "मी सन्मानाने वजीर पदावरुन दूर होणार आहे; पण

त्याआधी एखाद्या शहाण्या समजूतदार व्यक्तीला वजीरपद मिळावे, यासाठी त्या सात जणांची परीक्षा घेणार आहे.""जरुर ! जरुर !" बादशहा म्हणाला. बिरबल म्हणाला," खाविंद, त्यासाठी दहा फूट खोल एक विहीर बांधण्यात यावी." बादशहाने गवंड्यांकरवी दहा फूट खोल विहीर बांधून घेतली.

बिरबलाने या सात जणांना विहीरीत उतरवले आणि बजावले,"सूर्यास्तापर्यंत तुमच्यापैकी जो कोणी विहीरीबाहेर येईल त्याला माझे वजीरपद मिळेल."


बिरबलाने विहिरीतील शिडी काढून घेतली. ते सातजण वर येण्यासाठी धडपडू लागले. दुसऱ्या दिवसाची सकाळ झाली तरी कोणीच वरती आले नाही. बिरबल बादशहाकडे पाहून हसत म्हणाला,"यापैकी एकपण वजीरपदाच्या लायकीचा नाही. हे सगळे वर चढणाऱ्याचे पाय ओढत होते. हे जर आपापसात भांडण करुन स्वार्थ साधत असतील तर इतरांचे काय कल्याण करणार ?"

"बिरबल तू सेवानिवृत्त होऊ नकोस. वजीरपद तुझे आहे आणि ते तुझ्याकडेच राहील." बादशहा ठामपणे म्हणाला.

❖❖❖


सद्गुरु बाबाजींच्या प्रवचनांचे प्रसारण

झी.टी.व्ही. चॅनलवर वर प्रत्येक शनिवारी सकाळी ६.०० ते ६.३० वाजेपर्यंत



एपिक चॅनल वर दर सोमवार व मंगळवार सकाळी ७.०० ते ७.३० वाजेपर्यंत




कवीता

# हसती दुनिया

हसावे नित फुलांसारखे नि
आनंदी रहावे ।

सहनशील बनुनी अहंकाराला
तडीपार करावे ।

तीलांजली द्यावी अज्ञानाला अन्
प्रेमाने सर्वांना जिंकावे।

दुर्गुण सारे सोडूनी सद्गुणाने
प्रकाशित व्हावे।

निराकारास जाणण्यासाठी
सद्गुरुला शरण जावे ।

यातना दूर करण्यास सेवा,
स्मरण, सत्संग करावे।

सत्य म्हणे एकाला जाणावे
एक होऊनी नेक बनावे।

- सत्यनारायण बा. सौभागे
बुलढाणा

# जॉगिंग (धावणे) हृदयविकारावर उपयुक्त व्यायाम



हृदयविकार, डायबेटिस, रक्तदाब या गंभीर व्याधींबरोबरच स्थूलतेसारखा आरोग्याचा प्रश्नही जॉगिंगमुळे सुटतो असे दिसून आले आहे. धकाधकीच्या जीवनात आपल्या शरीरावर आणि मनावर ताण पडत असतो. हा ताण दूर करण्यासाठी नियमित व्यायाम करणे जरुरीचे असते. त्या दृष्टीने जॉगिंग हा सर्वोत्तम व्यायाम आहे.

चाळिशी ओलांडलेल्या व पन्नाशीकडे झुकलेल्या पिढीला आता 'जॉगिंग'सारखा नियमित एक्सरसाईज केल्याने आपले वजन नियंत्रणात राहण्यास तर मदत होतेच, शिवाय आपली प्रतिकार क्षमता वाढण्यासही मदत होते. आळसटलेल्या शरीराला ऊर्जा देण्याचे काम या एक्सरसाईजमुळे होते. मात्र हा एक्सरसाईज प्रमाणातच केला पाहिजे.

जॉगिंगचे फायदे -

- जॉगिंगमुळे हृदय मजबूत होते. जॉगिंगमुळे हृदयाच्या रक्तपुरवठ्यात वाढ होते.
- पचनशक्ती सुधारते. पचनाबाबतच्या सर्व तक्रारी दूर होतात.
- शरीराची प्रतिकारक्षमता वाढते.
- शरीरातील आणि मनातील नैराश्य दूर होते.
- शरीरातील चरबी जळून जाते. त्यामुळे अतिरिक्त वजन घटते.
- काही कारणांमुळे कमी भूक लागत असेल तर जॉगिंगमुळे ही समस्याही दूर होऊ शकते.
- पायांचे स्नायू मजबूत होतात. पाठीच्या तक्रारीवरही हा व्यायाम प्रकार उपयुक्त आहे.
- नियमित जॉगिंग केल्याने शांत झोप लागते.
- जॉगिंगमुळे मानसिक आनंद मिळतो. मात्र एका प्रमाणातच हा व्यायाम करणे आवश्यक आहे. साधारणतः अर्धा-पाऊण तास हा व्यायाम करावा, असे वैद्यकीय सल्लागार सांगतात. यापेक्षा अधिक वेळ व्यायाम केल्यास त्याचा ताण शरीरावर विशेषतः हृदयावर पडू शकतो. म्हणून उत्साहाच्या भरात प्रमाणापेक्षा जास्त काळ हा व्यायाम करणे अत्यंत चुकीचे आहे. या व्यायामामुळे उत्साह वाढतो. काम करण्याची ताकद वाढते.
- सकाळी सहा ते सातच्या दरम्यान हा व्यायाम करावा. मात्र काही कारणांमुळे सकाळी हा व्यायाम करणे जमत नसल्यास संध्याकाळी सात ते रात्री आठच्या दरम्यानही हा व्यायाम करता येऊ शकतो.

❖❖❖





# स्वास्थ्यदायक रंगीबेरंगी फळे व भाज्या

रंगीत फळे आणि भाज्यांच्या सेवनाने आपणास त्यांतील विशेष प्रकारच्या फायटो केमिकल्सचा लाभ होतो, जे कित्येक रोगांमध्ये उपयुक्त ठरतात. या दृष्टीने रंगाच्या आधारे आपला डाएट प्लॅन तयार करता येईल. यात फळे आणि भाज्या यांची पाच प्रमुख रंगांच्या समूहात विभागणी करण्यात आली आहे. जसे नारंगी/पिवळा, लाल, हिरवा, सफेद आणि निळा/जांभळा.

**सफेद रंग** - या रंगाच्या फळे आणि भाज्यांमध्ये 'एलीसिन' असते. हे तत्त्व एखाद्या चांगल्या अॅन्टीबायोटिकप्रमाणे काम करते. सफेद भाज्या ट्यूमरसारख्या आजारापासून बचाव करतात, तसेच कोलेस्टेरॉलचा स्तरही नियंत्रित करतात. याने



रोगप्रतिरोधक क्षमता तर वाढतेच शिवाय कार्डियोव्हॅस्क्यूलरसारख्या आजारापासून सुरक्षा होते.

**या रंगाची फळे व भाज्या** - सोयाबीन, लसूण, आले, कांदा, मशरुम, कोबी, बटाटा वगैरे.

**नारंगी/पिवळा रंग** - पिवळ्या तसेच नारंगी



फळांमध्ये कॅरोटिनॉयडस् तसेच बायोलेवॉयडस् असतात. बीटा कॅरोटिन आपल्या शरीरात जाऊन व्हिटॅमिन 'ए' मध्ये परिवर्तित होतात. डोळ्यांच्या आरोग्यासाठी हे जरुरी असते. कॅरोटिनॉयड्स डीएनएची क्षतिपूर्तीही घटते. याने शरीराची इम्यून सिस्टिम व्यवस्थित तर राहतेच. शिवाय यूवी

किरणांपासूनही त्वचेची सुरक्षा होते. अशा रंगांच्या फळांद्वारे वाढत्या वयाबरोबर होणाऱ्या स्नायूपेशींची क्षती रोखते तसेच ऑस्टियोपोरोसिसपासून बचाव होतो.

या रंगाची फळे व भाज्या - लिंबू, मोसंबी, खरबूज, आंबा, अंजीर, अननस, केळे, नारंगी, स्वीट कॉन, नाशपती, सीताफळ वगैरे.



लाल रंग - स्ट्रॉबेरी आणि टोमॅटोमध्ये एंथोसिएनिस तसेच लायसोपीन आढळतात, जे स्मरणशक्तीसाठी लाभदायक असतात. लायसोपीनमध्ये स्तन कॅन्सरशी लढण्याची क्षमता असते. लाल रंगाची फळे व भाज्या नियमित



खाण्याने अशी व्यक्ती मधुमेह, हृदयरोग तसेच वाढत्या वयातील प्रभाव यांपासून दूर रहाते.

या रंगाची फळे व भाज्या - लाल द्राक्षे, सफरचंद, डाळिंब, टोमॅटो, टरबूज, बीट वगैरे.

निळा/जांभळा रंग - निळ्या/जांभळ्या फळांमध्ये एंथोसिएनिंस तसेच फेनॉलिक्स असतात. फेनॉल्स हृदय रोग्यांसाठी फार लाभदायक असे. कारण त्यांचे ब्लड प्लेटलेटस्वर नियंत्रण असते. या फळांत व भाज्यांत असे तत्त्व असते, जे मेंदूची कार्यक्षमता वाढविते.

या रंगाची फळे व भाज्या - वांगे, जांभळे कोबी, जांभळी द्राक्षे, जांभूळ, आलुबुखार, किशमिश वगैरे.

हिरवा रंग - सल्फोराफेन व आयसोसायनेटयुक्त हिरव्या भाज्या कॅन्सररोधी असतात. ही तत्त्वे डिटॉक्स करणाऱ्या इंझाइम्सना सक्रिय करण्यात प्रभावी असतात. पुरेपूर हिरव्या भाज्यांमध्ये व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्सही असते. यांच्या सेवनाने हाडे व दात मजबूत बनतात. काकडी आणि पालकमध्ये क्लोरोफिल असते. ज्यामुळे रक्तशुध्दी होते.

या रंगाची फळे व भाज्या - हिरवे सफरचंद, हिरवी द्राक्षे, हिरवे नाशपती, कोबी, बीन्स, काकडी, पालक, भेंडी, मटर, शिमला मिरची, कोथिंबीर, लिंबू, हिरव्या भाज्या वगैरे. अशाप्रकारे रंगी-बेरंगी फळांद्वारे स्वास्थ्य लाभ घेता येईल.

❖❖❖



# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



सुहानी मांडे



ओवी सावंत



श्रीया जाधव



कशिश लोखंडे



ओजस निकम



कृष्णाय जाधव



प्रार्थना थोरात



अलोक सरवाडे




पूर्वी पाटिल



राजवी लहाणे



रेहा वर्तक



सत्यजीत जाधव



सेजल गावंड



श्रावण पेर्वी



श्रीशा मुळे


स्नेहा म्हात्रे


सुनैना बंडबे


वैष्णवी गवइ


वेदांत खंडागळे


वेदिका पिंपळे


यशराज हेगडे


अविरल खेराडे


मधुरता भुजबळ


संजना पताडे काव्या पताडे



सिमरण चौगुले


प्रज्वल अडसर


शिवाय जाधव


रोहिणी भोगणे


सुनिष्ठ कुंभार



# माहुलीगड

माहुलीगड हा महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे. भारत सरकारने या किल्ल्याला दिनांक १९ मार्च, इ.स. १९१० रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे.

आसनगाव या रेल्वे स्थानकापासून हा किल्ला ५ कि.मी. अंतरावर आहे. या किल्ल्यावर शिवाजी महाराजांचे बराच काळ वास्तव्य होते असे सांगितले जाते. किल्ल्याजवळून भारंगी नदी वाहते.ही नदी भातसई नदीची उपनदी आहे.

भौगोलिकदृष्ट्या शहापूरच्या वायव्येला असलेला हा किल्ला मध्ययुगीन कालखंडात भोवतालच्या महत्वाच्या ठिकाणाशी जोडलेला होता. कल्याण सुभ्याजवळ किल्ला म्हणून शिवकाळात त्याला विशेष महत्व होते. तसेच नाशिक व सुरत परिसराशी सुध्दा माहुलीचा संबंध होता. माहुली वरून जव्हार मार्गे सुरत तर माहुली वरून नाशिक आणि माहुली वरून किन्हवली-मुरबाड मार्गे नाणेघाट ओलांडून जुन्नर तसेच अहमदनगर अशा भौगोलिक रचनेमुळे माहुलीला अधिक महत्व प्राप्त झाले होते. ठाणे, कल्याण, भिवंडी, जव्हार, नाशिक, सुरत, मुरबाड अशा महत्वाच्या ठिकाणांना माहुली किल्ला जोडलेला असल्याने त्याला महत्व प्राप्त झाले होते.

सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये येणारा आणि अग्निजन्य खडकापासून बनलेला हा किल्ला एक दुर्गत्रिकुट आहे. माहुली, भंडारगड, आणि पळसगड मिळून हा किल्ला तयार झाला आहे.त्यामुळे ह्या किल्ल्याची रचना तीन वेगवेगळ्या भागांनी बनलेली आहे. मध्यभागी माहुली, उत्तरेस पळसगड आणि दक्षिणेस भंडारगड अशा दुर्गत्रिकुटाचा एक दुर्ग बनलेला असून त्यातील माहुली हा मोठा किल्ला आहे.

## किल्ल्याचे वर्णन आणि पोहोचण्याबाबत माहिती

माहुलीगाव ते किल्ल्याचा पायथा या १० मिनिटांच्या रस्त्यात आपल्याला एकूण ४ मंदिरे लागतात. ही मंदिरे सुद्धा ऐतिहासिक आहेत. प्रथम मारुतीचे मंदिर लागते. या मंदिरात असणारी मारुतीची मूर्ती जुनी आहे. विहिरीच्या समोर एक शिवमंदिर असून त्याला माहुलेश्वर असे म्हणतात. मंदिराच्या प्रवेशद्वारालगतच नंदी असून ज्या पायावर तो उभा आहे, तो पाय पाहता त्याचे प्राचीनत्व लक्षात येते. नंदिसमोर शिवलिंग असून इतर शंकराच्या मंदिरा प्रमाणेच हे शिवलिंग सुद्धा जमिनीच्या समान पातळीवर नसून काहीसे खाली आहे. गाभाऱ्यातील शिवलिंगाच्या मागे एका कोनाड्यात पार्वतीचे शिल्प आहे. या माहुली मंदिरात माहुलीचा संक्षिप्त इतिहास व माहुलीची रचना दुर्गप्रेमी मंडळाने चित्रित केली आहे. मंदिराकडे तोंड करून उभे राहिल्यावर मंदिराच्या बाजूने उजव्या हाताला एक रस्ता जातो. तो माहुली किल्ल्यावर उगम पावणाऱ्या भारंगी नदीकडे जातो. पावसाळ्याव्यतिरिक्त या नदीत फारसे पाणी नसते. मंदिराच्या डावीकडे देवीचे मंदिर असून त्यातील देवीची मूर्ती शिवकालीन असल्याचे सांगितले जाते. यातील मुख्य मूर्ती ही वज्रेश्वरीच्या मूर्तीसारखी आहे असे पुजारी सांगतात.या दोनही मंदिराच्या आसपास काही प्राचीन शिल्प सुद्धा विखुरलेली आहेत. देवीच्या मंदिरामागे एका पिंपळ वृक्षाखाली चौथऱ्यावर शिवलिंग व गणेश मूर्ती आहे. माहुलेश्वर मंदिराच्या मागून एक पायवाट जाते.या पायवाटेने पुढे गेल्यास दोन ते तीन मिनिटाच्या अंतरावर गणेश मंदिर असून त्याचा जीर्णोध्दार झाला आहे.

मंदिराच्या समोर एक दगडी घुमट, दगडी अर्धवट फुटलेला पाटा, युद्धप्रसंगांचे चित्रण असलेले अर्धवट फुटलेले विरगळ आहे. या चारही मंदिरातील मूर्ती किती जुन्या आहेत हे सांगता येणे तसे अशक्य आहे. पण त्या शिवकालीन वा पेशवेकालीन म्हणजेच मध्ययुगीन तर नक्कीच आहेत. पेशावेकाळात यातील काही मंदिरांची स्थापना झाली असे मानले जाते. किल्ल्याचा इतिहास आणि पायथ्याचा परिसर एकदा लक्षात आल्यानंतर प्रत्यक्षात किल्ला चढणे व किल्ल्याची पाहणी करणे सोपे जाते. मुळात हा एकच किल्ला नसून दुर्गत्रिकुट आहे. मध्यभागी माहुली उजवीकडे पळसगड आणि डावीकडे म्हणजे काहीसा पश्चिमेकडे भंडारगड असे हे त्रिकुट असल्याने एका दिवसात हे तीनही किल्ले पाहता येणे शक्य आहे. गडावर जाण्याचे वेगवेगळे मार्ग आहेत. किल्ल्याचा महादरवाजा हा मूळ मानला जातो. एका नाळेच्या तोंडाशी कातळ खोदून पायऱ्या खोदलेल्या असून पहारेकरांच्या देवड्या कोरलेल्या आहेत. या देवड्यांच्या पुढे बुरुज उभारले आहेत. वास्तविक ही किल्ल्यावर जायची मूळ वाट आहे. पण ह्या वाटेवर केवड्याचे वन वाढलेलं आहे. त्यामुळे ह्या मुख्य वाटेवर दुर्लक्ष झालेले आहे. ह्या महादरवाजाबरोबरच भंडारगडावरून कल्याण दारावाजाद्वारे किल्ल्यावर जाता येते. पण हा मार्ग खूपच अवघड असल्याचे स्थानिक सांगतात. त्यामुळे जाण्यासाठी गणेश मंदिराच्या समोरून गेलेली पायवाट हाच एक योग्य मार्ग आहे. सध्या ह्या पायवाटेने किल्ल्याकडे जाता येते.

या पायवाटेने जाताना वाटेत एक डोंगराची कडा लागते. तिचा आकार घोड्याच्या मानेसारखा असल्याने त्याला घोड्याची मान असे म्हणतात तेथून पुढे वर आल्यानंतर वाट साधी आणि एकदम उभी चढणीची होते. येथे आपण माहुलीच्या कड्याला येतो. कडा चढून जाण्यासाठी सुमारे ८-९ फूट उंचीची एक लोखंडी शिडी आहे. पूर्वी ही शिडी

मोकळी होती. आता मात्र ती मजबूत केली आहे. संपूर्ण किल्ला चढताना हे एकच ठिकाण अवघड आहे. शिडी चढून वर आल्यानंतर जवळ जवळ किल्ल्यात मागील बाजूने प्रवेश होतो. हा पायवाटेचा मार्ग मुळच्या महादरवाजाच्या वाटेपासून किमान पाचशे फुटापेक्षाही दूर आहे. किल्ल्यात प्रवेश केल्यानंतर डावीकडे झाडाझुडूपात न जाता उजवीकडे जी पायवाट आहे, तेथून महादरवाजाकडे जाता येते. तेथे एक पाण्याचे टाके व देवड्या म्हणजे पहाकऱ्याची जागा आहे. दुसरे एक पाण्याचे टाके शिडी चढून वर आल्यानंतर लगेच दिसून येते. पायथ्याशी शिवमंदिरासमोर विहीर आणि दोन टाकी या व्यतिरिक्त पाण्याची सोय अन्यत्र नाही. महादरवाजा वरून उजवीकडे न जाता सरळ वरच्या अंगाकडे गेल्यानंतर एक भिंत आणि कलाकुसरीची काही शिल्प आढळतात. तेथे उर्दू लिपीतील शिलालेख असून त्याचा अर्थ स्पष्ट झालेला नाही. या जागेला नमाजगिर असे म्हणतात. नमाजगिराच्या उजवीकडे गेल्यानंतर एका वाड्याचे अवशेष आढळतात. एकेकाळी चिरेबंदी असणाऱ्या वाड्याचे आज भग्नावशेष शिल्लक आहेत. किल्ल्यावरच्या पठाराच्या मध्यभागी एक तळे असून त्याला माहुलेश्वराचे तळे असे म्हणतात. पळसगडावरून तानासातलावाचे विहिंगमय दृश्य दिसते. पळसगडावर जाणारी वाट बांबूच्या बनातून जाते. पळसगड का म्हटले जाते हे सांगता येत नाही. मात्र कदाचित येथे पूर्वी पळसाची झाडे विपुल प्रमाणात असल्याची शक्यता नाकारता येत नाही. यालाच गिर्यारोहक छोटा माहुली असेही म्हणतात.

माहुलीच्या डाव्या बाजूस म्हणजेच काहीसा दक्षिणेस भंडारगड आहे. भंडारगड नाव पडण्याचे मुख्य कारण म्हणजे गडावरील या ठिकाणी भांडार असावे. या गडाच्या दक्षिणेस चार सुळके असून त्याला स्थानिक लोकांनी भटजी, नवरा, नवरी, करंगळी अशी नावे दिलेली आहेत. माहुलीवरील टाक्यांकडून भंडारगडाच्या दिशेने जाताना दोन शिल्पे असून त्यांचे चेहरे डुकरांसारखे आहेत. म्हणून त्याला डुक्करतोंडी शिल्पे असे म्हणतात. पायथ्याजवळील मंदिराच्या परिसरात पडलेल्या विरगळ प्रमाणे तेथे सुध्दा एक विरगळ आहे. मध्यभागी काही ज्योती सुध्दा आहे. त्याच्यापुढे एक तळे व कारवीमध्ये हरवलेली माहुलेश्वर मंदिराची जागा आहे. भंडारगडावर दहा खांबांचा एक हत्तीखाना असून तेथे कायम थंडगार पाणी असते. माथ्यावर पश्चिम दिशेला किल्ल्याचा मुख्य दरवाजा कल्याण दरवाजा आहे.

कल्याण सुभ्याकडून येणारा रस्ता म्हणून त्याला कल्याण दरवाजा असे नाव मिळाले असावे. या दरवाजातील आतल्या बाजूस मराठीत एक शिलालेख असून त्याची भाषा दुर्बोध आहे. माहुली किल्ला व भंडारगड यांच्यामध्ये एक आडवी तिडवी पसरलेली खिंड असून भंडारगडावर पोहोचण्यासाठी खिंड उतरून एक डोंगर चढावा लागतो. पळसगडावरील कल्याण दरवाजातून खाली उतरण्याची वाट अत्यंत अवघड आहे. एका घळीत एक झिजलेला व अर्थबोध न होणारा लेख व काही कोरीव पायऱ्या आहेत. तर दरवाजाजवळ एक टाके असून त्याला माठ टाक म्हणतात. तेथून पुन्हा माहुलीकडे जाताना उजव्या बाजूस एका डोंगराच्या माथ्यावर कड्यापाशी एका दरवाजाचे अवशेष आढळतात. याला हनुमान दरवाजा म्हणतात. तेथून पुढे हनुमान व गणपतीची कोरीव शिल्पे आहेत. तेथून खाली पायथ्याशी येणे किंवा माहुलीच्या मध्यभागी जावून त्या रस्त्याने पायथ्याशी येता येते, परंतु ह्या वाटेने स्थानिक लोकच ये जा करू शकतात कारण वाट अवघड आहे. भंडारगडाच्या दक्षिणेस

असलेल्या चार सुळक्यांचा व खिंडीच्या अलीकडे एक डोंगर असून त्यास माहुली-चंदेरी या नावाने ओळखले जाते पण हे नाव मूळचे नाही. माहुली किल्ल्यावरील भारंगी नदी तेथे उगम पावते. ही नदी पायथ्याला वेढा घालून पुढे जाते तेथून ती शहापूरला येऊन शेवटी भातसा नदीला जाऊन मिळते.

असे एकंदरीत माहुली किल्ल्याचे स्वरूप असून दोन शिलालेख, कल्याण, हनुमान व महादरवाजा, चिरेबंदी वाड्याचे अवशेष, पाण्याच्या टाक्या, माहुलेश्वर, मंदिर, तळे, बुरुज, देवड्या, विरगळ घोड्याची मान, भटजी, नवरा, नवरी, करंगळी हे सुळके, तीन ज्योती, डुक्करतोंडी शिल्प, हनुमान व गणेशाची शिल्पे, तानसा तलाव पॉईंट, भारंगी नदीचा उगम, सूर्योदय व सूर्यास्त, खिंडी, दरी,बांबू व केवड्याची बने, पावसाळ्यातील धबधबे व दुथडी भरुन वाहणारी भारंगी नदी किल्ल्याच्या पायथ्याशी असणारी चार मंदिरे, माथेरान पेक्षाही उंच व थंड हवा, हिरवीगार वनश्री यामुळे माहुली हे पर्यटकांना आकर्षित करणारे ठरले आहे. वानरे, ससे, माकडे, डुकरे, हरीण, हे प्राणी व मोर, घार, गिधाड यांसारखे पक्षी तर फुरश्यासारखे विषारी साप असे येथील वन्य जीवन समृध्द आहे.

सावरोली रस्त्यावरील सरकारी गोदामाजवळ एक वाघोबाचे मंदिर आहे. माहुलीच्या जंगलातील वाघाचा आपणास उपद्रव होऊ नये म्हणून हे मंदिर बांधले गेल्याचे सांगितले जाते. यावरून माहुलीच्या वन्यजीवानाची कल्पना येते. माहुलीवरील सुळके, माहुली किल्ला, व भंडारगड यामधील खिंड, वाटेवरली शिडी, हनुमान दरवाजा व कल्याण दरवाजा वरून खाली उतरण्याची वाट याठिकाणी दक्षता घ्यावी लागते. सकाळी लवकर जाऊन संध्याकाळी परतणे शक्य आहे. किल्ल्यावर राहायची व्यवस्था नाही. स्थानिक लोकांना विचारून



रस्त्याची माहिती करून घ्यावी. माहुली किल्ला हे पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित झाले आहे. किल्ल्यावरील व पायथ्यावरील ऐतिहासिक अवशेष हा आपल्या इतिहासाचा व संस्कृतीचा एक अनमोल ठेवा असून पर्यटकांनी, गिर्यारोहकांनी आणि अभ्यासुनी त्याचे योग्य जतन करावे.

माहुली किल्ल्याकडे जाण्यासाठी आसनगाव रेल्वे स्टेशनवर उतरून रिक्षा अथवा बसने शहापूर गावात उतरणे सोयीस्कर ठरते. शहापूर गावातून माहुली गावाच्या पायथ्यापर्यंत जाण्यासाठी रिक्षा, बस असतात. बस अनिश्चित आहेत. किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या मंदिरात विश्रांती घेऊन किल्ला चढणे हा एक उत्तम पर्याय आहे. सुमारे दीड ते दोन तासाच्या चढणीत वाटेत कोठेही पाणी नसल्याने पाणी जवळ असावे. किल्ल्याच्या पायथ्याशी जी मंदिरे आहेत त्यांना सुध्दा इतिहास आहे.म्पेशवेकालीन वाड्याचे काही अवशेषही किल्ल्याच्या पायथ्याशी आहेत. पेशवाईच्या काळात किल्ल्याच्या पायथ्याशी सरदारांची कचेरी, त्यांचे वाडे होते. त्यांचे अवशेष आजही आहेत. मंदिरासाठी वर्षासने दिली होती. परंतु पेशवाईच्या अस्तानंतर ब्रिटीश काळात आणि स्वातंत्र्यानंतर मंदिराकडे लक्ष दिले गेले नाही.

❖❖❖




वडील : बंड्या, तुला एका विषयात इतके कमी गुण का मिळाले ?
बंड्या : आजारी पडल्यामुळे
वडील : अरे पण तुझी तब्बेत तर ठणठणीत होती !
बंड्या : मी ठणठणीत होतो हो ! पण माझ्या पुढच्या बाकावर बसणारा मुलगा त्या दिवशी खूप आजारी पडला होता. त्यामुळे 'मी' काहीच लिहू शकलो नाही.

❖ ❖ ❖

आक्काताई : काय हो, तुमची यमू परीक्षेत पास झालीय ना ? मग ती नदीच्या काठावर उभी राहून काय करतेय एवढा वेळ ? काही बरं वाईट .....
यमूची आई : छे हो, आमची यमी की नाही काठावर पास झाली, म्हणून ती काठावर उभी आहे.

❖ ❖ ❖

चहावाला : (ट्रेनमध्ये) चाय बोलो, चाय, चाय बोलो चाय !
हौसाकाकू : अरे मेल्या, आम्ही कशाला चाय बोलू, तू च बोल ! तुला विकायची आहे ना !

❖ ❖ ❖

शिक्षक : लक्षात ठेवा, तुमच्यापैकी शाळेत कुणीही उशीरा आलात तर दंड भरावा लागेल. पहिल्यांदाच उशीरा आलात तर पाच रुपये, दुसऱ्यांदा आलात तर दहा रुपये आणि तिसऱ्यांदा आलात तर वीस रुपये भरावे लागतील.
गण्या : सर, महिन्याचे किंवा पूर्ण वर्षाचे एकदम भरले तर किती सूट मिळू शकेल ?

❖ ❖ ❖

एका बसमध्ये एक साधू आणि एक दारुडा एकाच सीटवर बसले होते. साधूला कळले की, हा माणूस दारु प्यायलेला आहे. साधू दारुड्याला म्हणाला, 'अरे बाबा, तू ज्या मार्गाने जात आहेस तो नरकाकडे जाण्याचा मार्ग आहे.'
दारुडा : अस्सं ! अहो कंडक्टर आधी गाडी थांबवा.
कंडक्टर : काय झालं ?
दारुडा : अहो चुकून या गाडीत बसलो, मला नरकात नाही जायचंय !

❖ ❖ ❖

जर कोलंबसला मराठी बायको असती,
तर त्याला अमेरिकेचा शोध कधीच लागला नसता...
कारण बायकोने विचारलं असतं...
कुठे चाललात ? कोणाबरोबर ?
काय शोधायला जाताय ? इकडे मिळणार नाही का ?
नेहमी तुम्हीच का जाता ? मी इथे एकटी काय करु।
मित्र बरोबर असतीलच ना ? मी पण येऊ का ?
कोलंबस (चिडून): जाऊ दे, मी जातच नाही ?

❖ ❖ ❖




**प्रश्न :** घामामुळे शर्टाची चांदीची बटणे काळी का पडतात ?

**उत्तर :** घामात युरिया, कार्बन-डाय-ऑक्साईड वायू, मीठ, पाणी वगैरे पदार्थ मिसळलेले असतात. त्यामुळे घाम आम्लधर्मी बनतो. अशा घामाच्या सान्निध्यात चांदीची बटने आली की चांदी व घामातील आम्ले यांच्यात रासायनिक प्रक्रिया घडते. चांदीचे नायट्रेट, सायट्रेट असे क्षार तयार होतात. हे क्षार सूर्यप्रकाशात आले की काळे पडतात. त्यामुळे चांदीची बटने काळी होतात.

**प्रश्न :** घामाची चव खारट का असते ?

**उत्तर :** शरीरात तयार होणारे निरुपयोगी पदार्थ उत्सर्जन संस्थेमार्फत शरीराच्या बाहेर टाकले जातात. युरियासारखे पाण्यात द्राव्य असणारे पदार्थ मूत्र आणि घामावाटे (त्वचेच्या छिद्रातून) बाहेर टाकले जातात. ह्या पाण्यात युरियाबरोबर मीठ आणि इतर क्षारसुध्दा बाहेर पडतात. मिठाची चव खारट असल्यामुळे घामाची चव खारट असते.

**प्रश्न :** घामाघुम झालेला माणूस पंख्याखाली बसल्यावर त्याला गार का वाटते ?

**उत्तर :** पंख्याच्या हालचालीमुळे त्या भागातील हवेची वेगाने हालचाल होते. त्यामुळे हवा हलण्याने अंगावरील घामाचे बाष्पीभवन होते. घामाचे बाष्पीभवन होताना त्याच्या शरीरातील तापमानात घट होते. बाष्पीभवनाच्या या नियमाला अनुसरुन घामाघुम झालेला माणूस पंख्याखाली बसल्यावर त्याला गार वाटते.


**प्रश्न :** उन्हाळ्याच्या दिवसात आपल्या शरीरातून घामाच्या धारा का निघतात ?

**उत्तर :** उन्हाळ्याच्या दिवसात अंगातून घामाच्या धारा निघाल्याने आपण अस्वस्थ होतो. आपल्या शरीराचे तापमान ९८.४ फॅ. इतके रहावे अशी निसर्गाची योजना आहे. भोवतालचे तापमान वाढले की शरीराचे तापमान वाढू लागते. तसे होऊ नये म्हणून घाम येण्याची युक्ती शरीराची आहे. घाम आल्यावर त्याची वाफ होऊ लागते. ती होण्यासाठी शरीरातील उष्णता खर्ची पडते आणि त्यामुळे शरीराचे तापमान खाली येते व आपणास गार वाटते.

**प्रश्न :** उन्हाळ्यात बाष्पीभवनामुळे शरीराचे तापमान कायम कसे ठेवले जाते ?

**उत्तर :** उन्हाळ्यात आपल्या शरीराच्या कातडीच्या छिद्रातून बाहेर पडणाऱ्या घामाचे त्वरीत बाष्पीभवन होते. या क्रियेत शरीरातून काही उष्णता काढून घेतली जाते त्यामुळे शरीराचे तापमान वाढत नाही.

❖❖❖



शिवाजीराजांनी सर्वांना साष्टांग नमस्कार घातला. गागाभट्टजींनीही घातला. सदाशिवशास्त्री पुढे उभे राहिले;परंतु त्यांनी नमस्कार केला नाही. तेव्हा समर्थांनी शास्त्रीबुवांना हात जोडून नमस्कार केला. त्यावर सदाशीवशास्त्री म्हणाले, आम्ही आपल्याशी वाद करण्यासाठी आलो आहोत. वादात आपली योग्यता अधिक ठरल्यास आम्ही आपल्याला नमस्कार करू. नाहीतर आशीर्वाद देऊ.

हे ऐकून समर्थ हसले आणि म्हणाले, आपण साक्षात भूदेव आहात, आपल्या नमस्काराची अपेक्षा नाही, आपण आशीर्वाद दिला तरी पुरे.

शास्त्री म्हणाले, परीक्षा झाल्याशिवाय कोणतीही गोष्ट योग्य नाही.

समर्थ म्हणाले, आमची परीक्षा कशाची ? आम्ही ना पंडित ना वैदिक. वनातील वनचरांप्रमाणे राहतो व रामाचे दास म्हणवितो. रामाच्या विभूती कशा, कोणत्या ठिकाणी आहेत त्यांचा अंत नाही. ह्याकरिता आपण अशा दुराग्रहात पडून आमच्याशी वाद घालू नये !

शास्त्री म्हणाले, मी आपल्यापाशी काही ब्रह्मज्ञान शिकण्यासाठी आलो नाही. या गोष्टी भोळसट लोकांना , बायाबापड्यांना सांगाव्यात.

आपण आलो तरी समर्थ दगडावरुन काही उठले नाहीत. स्वस्थपणे कुबडीला टेकून बसले आहेत, आणखी वर गुजगोष्टी करतात, असे मनात येऊन सदाशिवशास्त्री क्रोधाने लाल झाले.

समर्थ दर्शन : भाग - ६१

# वासुदेवशास्त्रींचं गर्वहरण

शिवाजी महाराजांची स्वारी येत असल्याचे पाहून समर्थांनी कल्याणस्वामींना विचारले, कल्याण कोण येत आहे रे ?

कल्याण म्हणाले, शिवरायांची स्वारी येत असून आणखी दोन तीन पालख्या आहेत.

समर्थांनी हसत म्हटले, ठीक आहे.

इतक्यात सर्व मंडळी येऊन दाखल झाली.

इतक्यात पलीकडून एक मोळीविक्या चालला होता, त्याला पाहून समर्थांनी विचारले, कल्याणा तो तिकडून कोण जात आहे ?

कल्याणस्वामी म्हणाले, मोळीविक्या आहे.

त्याला इकडे बोलाव, म्हणून समर्थांनी आज्ञा केली. कल्याणस्वामींनी त्याला हाक मारुन जवळ बोलावले. तो दूर उभा राहून म्हणाला, काय हुकूम आहे जी मायबाप ?

समर्थ म्हणाले, तू कोण आहेस ?

मोळीविक्या म्हणाला, मी जातीचा अंत्यज (शूद्र) असून मठामध्ये दररोज मोळी टाकतो आणि जी भाकरी देतात ती घेऊन निर्वाह करुन राहातो.

हे ऐकून समर्थांनी कल्याणस्वामींना कुबडी देऊन तिच्याने एक रेष काढायला सांगितली व तिच्या आतील बाजूस त्या मोळीविक्याला यायला सांगितले.

त्याप्रमाणे तो आल्यावर समर्थांनी त्याला प्रश्न केला, आता तू कोण आहेस ?

अंत्यजाने उत्तर दिले, आता मी शूद्र आहे.

समर्थांनी कल्याणाकडून पुन्हा दुसरी रेषा काढून तिच्या आत त्याला हाक मारुन पुन्हा विचारले, आता तू कोण आहेस ?

तो म्हणाला, मी ब्राह्मण आहे.

पुन्हा तिसरी रेष काढून त्या रेषेच्या आत बोलावले व विचारले, आता तू कोण आहेस ?

तेव्हा अंत्यज म्हणाला, आता मी दशग्रंथी विद्वान ब्राह्मण असून षट्शास्त्रांत पारंगत आहे.

हे ऐकून समर्थ म्हणाले, तर अनायसे हे येथे सत्पात्र ब्राह्मण आले आहेत. त्यांच्याशी आपण वाद करा.

क्रमशः



मनाला समजवायचं असतं. हेच मन राम आणि रावण बनून जातं, हेच संकीर्ण आणि विशालही बनतं, हेच गोड आणि कडू होतं म्हणून या मनाला समजवण्याची आवश्यकता आहे. जर हे समजले तर जीवन सुंदर बनेल. घोड्याला लगाम लावली तर तो उपयोगी बनतो नाहीतर नुकसानीला कारण बनतो. म्हणूनच मनाला चेतन केलं जातं. याला लगाम लावण्याच्या गोष्टी केल्या जातात नाहीतर मन लोभी आणि लालची बनून जाईल. लगाम असेल तर वाणी मधुर राहील, मन बेलगाम घोडा बनणार नाही.

- युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज



# सेवेमुळे जीवन सफल होते

हे तन-मन-धन संतांच्या सेवेसाठीच आहे. परंतु सेवा सुध्दा आपल्या मनाने होत नाही तर ज्यावेळी सेवा स्वतः गुरु करवून घेतो त्याचवेळी सेवा होते. दुसऱ्याचं नुकसान होईल असं कोणतंही काम करु नका. मानवतेचं काम करा, प्रत्येकाचं भलं करण्याचा प्रयत्न करा. दुसऱ्याला फायदा होईल असंच काम करा, जो तन-मन-धनाने संतांची सेवा करतो त्याचं जीवन सफल होते. जो तन- मन-धनाने संतांची सेवा करत नाही त्याच्या सर्व गोष्टी निष्फळ होतात, यासाठी सर्वांशी प्रेम करायचे आहे, सर्वांचा सत्कार करायचा आहे. चुकून सुध्दा कोणा संत महापुरुषाची निंदा करु नका, कोणाशी ईर्ष्यासुध्दा करु नका. नेहमी निराकाराचं ध्यान करत संतांच्या संगतीत राहायचं आहे. जे निराकाराचं भय मानत नाही त्यांच्यावर दुष्ट प्रवृत्तींचा मोठ्या प्रमाणात प्रभाव पटतो. यासाठी प्रेम आणि सत्कारयुक्त संतजनांची सेवा करा. निराकाराला अंगसंग जाणून प्रार्थना करा, त्यामुळे तुमची सर्व कामं पूर्ण होतील.

- बाबा अवतारसिंहजी

# जिगरबाज आरती पाटील



गुरुकडून धडे घेण्याच्या इराद्याने ती गडहिंग्लजहून नासिकला निघाली होती. बसमध्ये चढताना गाडीचा पत्रा तिच्या पायात घुसला. नस तुटली. रक्ताची धार लागली. १८ टाके पडले. आता सगळंच थांबलं असं तिला वाटलं. ज्या पायावर धाव घ्यायची त्यानेच असा दगा दिल्यावर खरंतर एखादी खचली असती. पण ती जात्याच खंबीर, निश्चयी होती. घरच्या परिस्थितीवर मात करुन ती सहनशीलही बनली होती. त्यामुळेच महापुराने गावाकडची शेती उद्ध्वस्त झाली असताना ती मात्र ठाण्याच्या मॅरेथॉनमध्ये धावली. इतकंच नव्हे तर पहिली आली. ही जिगरबाज तरुणी आहे, आरती पाटील. वयाच्या पाचव्या वर्षापासून धावण्याचा आनंद लुटणाऱ्या आरतीने २००९ साली चेन्नईच्या ग्रामीण राष्ट्रीय स्पर्धेत रौप्यपदक मिळविले अन् नंतर मात्र मागे वळून पाहिले नाही. 'क्रॉस कंट्री'सह लांब पल्ल्याच्या स्पर्धांत ती देशभर धावली. अनेक पुरस्कार मिळविले. तरीही ती समाधानी नव्हती. घरची गरिबी जणू तिच्या करिअरसाठी बेड्या बनल्या. अखेर तिच्या शेतकरी पालकांनी 'शुभचिंतकां'चा विरोध पत्करुन तिला नाशिकला गुरु विजेंदर सिंग यांच्याकडे सोपविले. तेव्हाही तिची प्रकृती खालावलेली होती. पण जिद्दी स्वभावाने तिला पुन्हा उभे केले. गेली चार वर्षे तर ती जीव तोडून धावते आहे. २०१६ मध्ये कतारच्या आशियाई क्रॉस कंट्री स्पर्धेत ती धावली. यशाने चकवा दिला तरी नंतर देशातील जवळपास सर्व स्पर्धांत ती धावली. जुलैमध्ये इटलीतील उन्हाळी स्पर्धेतही ती सहभागी झाली. **महापुराने झालेली हानी भरुन निघावी यासाठीच स्पर्धेत भाग घेतल्याचे तिने जेव्हा सांगितले, तेव्हा अनेकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.** क्रिकेटपटू अनुजा पाटील, कुस्तीपटू रेश्मा माने व नेमबाजपटू राही सरनोबत यांच्याप्रमाणेच आरतीही कोल्हापूरचे नाव रोशन करीत आहे.

(साभार)



# किट्टी

चित्रांकन व लेखन :
अजय कालडा




एवढे बोलून किट्टी जाऊ लागली परंतु तिचे तिन्ही मित्र हैराण होऊन पाहातच राहिले.
अरे, किट्टीला समजवा.
चिंटू, किट्टी कुठे आहे ?
टीचर, किट्टी खूप आजारी आहे म्हणून ती आज शाळेत नाही आली.


अरे! इथे किती मज्जा आहे. बरं झालं मी शाळेत गेले नाही. नाही तर मला इतकी मज्जा करायला कुठे मिळाली असती?
अरे! ही तर किट्टी आहे वाटतं, परंतु ती इथे कशी? मी बागेत जाऊन पाहते.
अरे बापरे! ही तर आई आहे, चला पळा...


कुठं गेली ही किट्टी ?
आता मी इथे पटकन लपून बसते म्हणजे मी आईला दिसणार नाही.
चल मेरे डॉगी टिक-टिक-टिक
अरेपळापळा...हाडॉगीतरमाझ्या मागेचलागलाआहे.वाचवा,वाचवा.... कोणीतरीमलावाचवा...
आई, मला वाचव.
किट्टी तू इथे कशी काय ? तू शाळेत का नाही गेलीस ? चल आता घरी चल तुझ्या बाबांनाच सांगते.
अगं, आई मला क्षमा कर. मी पुन्हा असं नाही करणार, दररोज शाळेत जाईन.



कथा

# विद्वत्तेचा गर्व नसावा !

फार फार वर्षापूर्वीची ही गोष्ट आहे. महाकवी कालिदास यांना आपल्या विद्वतेचा थोडासा का होईना गर्व झाला होता. एकदा ते प्रवासात असताना त्यांना तहान लागली. जवळच एक वृध्द स्त्री विहिरीवर पाणी भरत असल्याचे त्यांना दिसले.

कालिदास पुढे जात म्हणाले, "आई प्यायला पाणी द्या. पुण्य लागेल!" ती वृध्दा म्हणाली," बेटा, मी तुला ओळखत नाही. मी पाणी देते पण कोण तू? कुठून आलास?" कालिदास म्हणाले, "मी एक प्रवासी आहे."

वृध्दा म्हणाली, "प्रवासी तर दोनच आहेत. एक सूर्य आणि दुसरा चंद्र. दोघेही दिवसरात्र प्रवास करत असतात." कालिदास म्हणाले, "मी पाहुणा आहे. पाणी देण्याची विनंती करत आहे." ती स्त्री म्हणाली, "तू पाहूणा कसा काय असू शकतोस?

या जगात पाहुणे तर दोनच आहेत. एक म्हणजे पैसा आणि दुसरे तारुण्य या दोन्ही गोष्टी हातून जायला वेळ लागत नाही. खरं सांग, तू कोण आहेस?" कालिदास म्हणाले "मी सहानशील आहे. आता तरी पाणी द्या." स्त्री म्हणाली "सहनशील दोघंच आहेत, एक म्हणजे पृथ्वी; जी सगळ्या पापी आणि पुण्यात्मांचं ओझं वहात असते. तिला भेगा पाडून बी पेरले तर ती मुबलक धान्यच देते. दुसरं म्हणजे वृक्ष. वृक्षाला दगड मारले तरी ते फळं देतात, तू सहनशील नाहीस. सांग तू कोण आहेस?" या तर्कवितर्कामुळे कालिदास अगदी मेटाकुटीला आले होते. ते म्हणाले "मी हट्टी आहे."



स्त्री म्हणाली "हट्टी तर दोनच गोष्टी असतात. एक म्हणजे नखं आणि दुसरे केस. कितीही वेळा कापले तरी पुन्हा पुन्हा उगवतातच. तेव्हा हे तरुणा खरं सांग तू कोण आहेस?" कालिदास वैतागून म्हणाले "मी मूर्ख आहे."

ती स्त्री पुन्हा हसून म्हणाली, "नाही तू मूर्ख असू शकत नाही. मूर्ख दोनच व्यक्ती असू शकतात. एक म्हणजे राजा, जो पात्रता नसतानाही सगळ्यांच्यावर राज्य करतो आणि दुसरा त्याच्या दरबारातील पंडित. जो राजाला खूश करण्यासाठी चुकीच्या गोष्टीलाही तर्काच्या मांडणीत बसवून सगळं काही योग्य ठरवण्याच्या उठाठेवी करत असतो." आता कालिदासाने त्या वृध्द स्त्रीचे पाय धरले. ती म्हणाली "उठ वत्सा!" कालिदासाने पाहिले तर साक्षात देवी सरस्वती उभी होती. कालिदास पुन्हा नतमस्तक झाले.

देवी म्हणाली, "वत्सा स्वतःच्या विद्वत्तेचा कधीही गर्व असता कामा नये. ज्ञानाच्या जोरावर तुला मानसन्मान आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. ही प्रतिष्ठा म्हणजेच आपले कर्तृत्व असं तू मानू लागला आहेस. तुझे डोळे उघडण्यासाठी मला हे सोंग करावं लागलं." कालिदासांना आपली चूक उमगली आणि ते पोटभर पाणी पिऊन पुढच्या प्रवासाला निघाले.

तात्पर्य : विद्वत्तेविषयी कधीही गर्व बाळगू नये. वृथा अभिमान विद्वत्तेला संपवून टाकतो.

❖❖❖



कथा

# राजा विचित्रसेन

एका नगरात विचित्रसेन नावाचा राजा राज्य करत होता. दुष्कर्मा नावाचा त्याचा वजीर होता. राजा विचित्रसेन हा कोणतेही काम करताना आपल्या वजीराला बरोबर घेत असे आणि वजीराच्या सल्ल्याने सर्व कामे करत असे.

राजा विचित्रसेन प्रत्येक महिन्याला वेश पालटून आपल्या नगरातील लोकांशी संपर्क साधत असे. त्यात कधी मोठे व्यापारी असायचे. कधी लहान मोठे दुकानदार असायचे तर कधी शेतकरी असायचे. एखादा धंदा व्यवसाय तेजीत चालू असेल तर राजा त्याच्यावर कर लावून पैसा जमा करत असे. अशाप्रकारे राजाने आपल्या कोशात भरपूर धन जमा केले होते. त्यामुळे सर्व व्यवसायिक लोक नाराज होते.

एके दिवशी राजा असाच वेश पालटून फिरत असताना दुपार झाली ऊनही खूप होते. राजाला तहान लागली. थोडे पुढे गेल्यानंतर त्याला ऊसाचे गुऱ्हाळ चालू असल्याचे दिसले. राजा व वजीर त्या गुऱ्हाळाजवळ गेले. गुऱ्हाळाचा मालक शेतकरी पुढे सरसावत म्हणाला, "या पाव्हणं बसा." त्यावर

राजा म्हणाला, “आम्हाला तहान लागली आहे, पाणी द्या.” शेतकरी म्हणाला, “पाणी कशाला ऊसाचा गारेगार रस देतो पाहिजे तेवढा प्या.” राजा आणि वजीर रस पिऊन तृप्त झाले.

गुऱ्हाळात बरेच कामगार काम करत होते. एका बाजूला रसाने भरलेल्या काईली उकळत होत्या. एका बाजूला गुळाच्या ढेपी एकावर एक थर लावून ठेवलेल्या होत्या. हे सर्व पाहून राजा वजीराला म्हणाला, “शेतकऱ्याला खूप फायदा होत असावा, याला कर लावला पाहिजे.”

राजा परत नगरात आला व त्याने सर्व ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणात कर लावला. त्यामुळे दुसऱ्या वर्षी शेतकऱ्यांनी ऊसाची लागवड करणे बंद केले.

राजा दुसऱ्या वर्षी पुन्हा जिथे रस प्यायला होता तिथे गेला आणि शेतकऱ्याजवळ पाणी मागितले. शेतकऱ्याने पाणी दिले. त्यावर राजा म्हणाला, “गेल्या वर्षी इथं ऊसाचं गुऱ्हाळ होतं या वर्षी काही दिसत नाही.”

त्यावर शेतकरी म्हणाला, “आमचा राजा विचित्रसेन याची मती फिरली आहे. त्याने ऊस मालकांवर मोठा कर लादला. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी ऊसाची शेती बंद केली आहे.” हे शेतकऱ्याच्या तोंडचे शब्द ऐकताच राजाला आपली चूक कळली. नगरात परत आल्यानंतर त्याने सर्व शेतकऱ्यांवरील कर रद्द केले.

आता पुन्हा शेतकऱ्यांना व सर्वच व्यवसायिकांना भरभराटीचे दिवस आले.

❖❖❖

# गुण प्राण्यांचे




उंचच उंच जिराफाची मान
शेंड्यावरचं खातो पान



उंचच उंच असतो उंट
पाण्याविना फिरे वाळवंट

हत्ती असतो वजनात भारी
केळी खातो डझनावारी





जरी उपाशी असला श्वान
नेहमीच राखतो मालकाची शान



ओझी वाहतं गाढव फार
पण करत नाही कधी तक्रार

चुका होतात आमच्या अमाप
परि सद्गुरु करतो माफ

- विठ्ठल ज्ञानदेव वडाम
कोल्हापूर





# सातारा

तालुके - सातारा, कराड, वाई, महाबळेश्वर, फलटण, कोरेगाव, पाटण, खंडाळा, जावळी (मेढा), माण (दहीवडी), खटाव (वडुज)

सीमा - उत्तरेस पुणे, पूर्वेस सोलापूर, दक्षिणेस सांगली, पश्चिमेस रत्नागिरी, वायव्येस रायगड.

नद्या - कृष्णा, कोयना, वेण्णा, नीरा, तारळई, कुंडली, उरमोडी, माणगंगा, वांग, मांड.

खनिजे - काही प्रमाणात बॉक्साईट.

प्रमुख शेतकी उत्पादने - बाजरी, ज्वारी, गहू, भात, हरभरा, ऊस, भूईमूग, बटाटा, सोयाबीन, कांदा, लसूण.

धरणे - शिवाजी सागर (कोयना नदीवर), धोम खोडशी (कृष्णा नदीवर).

थंड हवेची ठिकाणे - महाबळेश्वर, पाचगणी.

विशेष माहिती-

- सज्जनगड - समर्थ रामदास स्वामींची समाधी.
- प्रतापगड, अजिंक्यतारा, मकरंदगड, पांडवगड इत्यादी किल्ले याच जिल्ह्यात आहेत.
- शिखर शिंगणापूर - शंभू महादेवाचे मंदिर
- कृष्णा नदीचा उगम महाबळेश्वर येथून होतो.
- कराड येथील कृष्णा-कोयनेचा संगम, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या या प्रीतीसंगमावरील समाधीमुळे येथे स्थानिक जनतेबरोबरच राजकीय नेते, पर्यटक यांचीही वर्दळ वाढली आहे.
- महाराष्ट्रातील पहिली सैनिकी शाळा सातारा येथे सुरु करण्यात आली होती.
- सातारा येथील रयत शिक्षण संस्थेने शिक्षण क्षेत्रात स्पृहनीय यश संपादन करुन राज्यात मोठा लौकिक प्राप्त केला आहे.
- सातारा जिल्ह्यात लोणंद परिसरात कांदा लसूण यांचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते.
- सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात प्रतिसरकारची स्थापना केली होती.



- कोयना नदीवर हेळवाकजवळ मोठे धरण आहे. तेथील जलाशयास शिवाजीसागर म्हणतात.
- पाटण जावळी येथे लोहखनिज व बॉक्साईडचे साठे आढळतात.
- सातारा रोड व जरंडेश्वर येथे लोखंडाचे कारखाने.
- फलटण, यशवंतनगर, कराड, भुईज, शेंद्रे , मरळी, साखरवाडी व रेठरे बुद्रुक येथे साखर कारखाने.
- सातारा - स्कूटर, सुटकेस, औषधे, प्लॅस्टिकच्या वस्तूंचे कारखाने.
- फलटण - जिनिंग व प्रेसिंग उद्योग, प्रसिध्द रामंदिर.
- औद्योगिक वसाहती - सातारा, कराड, फलटण, वाई, शिरवळ.
- मुंबई - बंगळूर हा राष्ट्रीय महामार्ग या जिल्ह्यातून जातो.
- सातारा - जिल्ह्याचे मुख्य ठिकाण, प्रेक्षणीय राजवाडे व जलमंदिर, शहरालगत अजिंक्यतारा किल्ला, किल्ल्यावर दूरदर्शन व आकाशवाणी केंद्र, छत्रपती वस्तु संग्रहालय.
- पाचगणी - थंड हवेचे ठिकाण, रेशीम संशोधन केंद्र, फळांच्या मुरांब्यासाठी प्रसिध्द, निवासी शाळामुळे प्रसिध्द शैक्षणिक केंद्र बनले आहे.
- पाटण - कोयना व केरा नद्यांच्या संगमावर वसलेले तालुक्याचे मुख्य ठिकाण, कोयना धरण.
- औंध - श्रीभवानी संग्रहालय, यमाई मंदिर, औंध संस्थानची राजधानी असलेले ठिकाण.
- वाई - शंभराहून अधिक मंदिरे, मराठी विश्वकोश निर्मिती केंद्र, येथून जवळच मांढरदेव येथे काळूबाईची मोठी जत्रा भरते.
- कराड - कृष्णा- कोयनेच्या संगमावर वसलेले तालुक्याचे मुख्य ठिकाण, कृष्णामाई मंदिर, यशवंतराव चव्हाण समाधी स्थळ, कराडपासून जवळच आगाशिवा डोंगरात प्राचीन बौध्द लेणी आहेत.
- महाबळेश्वर - कृष्णा नदीचे उगमस्थान, थंड हवेचे ठिकाण, मधुमक्षिका पालन केंद्र.

❖❖❖

# सामान्य ज्ञान



१) नोव्हेंबर २००८ मध्ये कोणत्या नदीला 'राष्ट्रीय नदी' घोषित करण्यात आले ?
अ) यमुना ब) सरस्वती क) गंगा ड) सतलज

२) 'सहनशीलता दिवस' कोणत्या तारखेला साजरा केला जातो ?
अ) १६ नोव्हेंबर ब) २६ नोव्हेंबर क) १६ ऑक्टोबर ड) २६ डिसेंबर

३) महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी असे कोणत्या नदीला म्हटले जाते ?
अ) कृष्णा ब) कोयना क) गोदावरी ड) पंचगंगा

४) सुप्रसिध्द 'हावडा ब्रीज' कोणत्या शहरात आहे ?
अ) चेन्नई ब) दिब्रुगड क) कोईमतूर ड) कोलकाता

५) भीमा नदीकाठी वसलेले शहर कोणते ?
अ) सोलापूर ब) पुणे क) पंढरपूर ड) पैठण

६) अंदमान-निकोबार बेटांची राजधानी कोणती ?
अ) सिल्वासा ब) पोर्ट ब्लेअर क) दमण ड) ऐजवाल

७) पुराणात 'चक्रपाणि' असे कोणाला म्हटले आहे ?
अ) विष्णू ब) शंकर क) सरस्वती ड) लक्ष्मी

८) रामायणातील वालीचा पराक्रमी पुत्र कोण ?
अ) नल ब) नील क) सुग्रीव ड) अंगद

९) २१ नोव्हेंबर २०१३ रोजी भारताचे कोणते यान अंतराळात झेपावले ?
अ) चांद्रयान-१ ब) चांद्रयान-२ क) मंगळयान-१ ड) मंगळयान-२

१०) या विश्वात स्थिर काय आहे ?
अ) सूर्य ब) ध्रुवतारा क)मन ड) परमात्मा

उत्तरे इतरत्र

# मोठ्या पायाचा मेगापॉड



जगभरात पक्ष्यांच्या जवळपास ८६०० जातीपैकी २८५ प्रजाती समुद्री आहेत. त्यापैकी मेगापॉड हा पक्षी भारतात फक्त अंदमान-निकोबार बेटांजवळ आढळतो.

मेगापॉड हा ग्रीक भाषेतला शब्द आहे. याचा अर्थ मोठा पाय असा होतो. मेगापॉडचा आकार कोंबडीसारखा असतो. पायाचा आकार मोठा व पायाचा आकार लहान असतो. या पक्ष्याचा रंग भुरकट असतो. मेगापॉड समुद्र किनाऱ्याजवळच्या घनदाट जंगलात राहातो. या पक्ष्याचे घरटे जमिनीवर वारूळाच्या स्वरुपात असते. सामूहिक स्वरूपात प्रजनन होते. त्यामध्ये एका वेळी मादी १० ते १२ अंडी देते. मेगापॉड वेगाने धावतो. साधारणपणे समूहात किंवा दोनच्या जोडीमध्ये राहतो. तो मुख्यत: कीडे कीटक, कृमी, शंख आणि शाकाहारी पदार्थ जास्त खातो. मेगापॉड अंदमान-निकोबार बेटाची एक वेगळी ओळख आहे, पण खेदाची गोष्ट म्हणजे हा पक्षी हळूहळू लोप पावत आहे.

- संकलन : अंकीत चंद्रकांत जाधव

## ❖ महाराष्ट्राचे प्रशासकीय विभाग ❖

| क्र. | मुख्यालय | भौगोलिक विभागाचे नाव | जिल्ह्यांची संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | कोकण | ७ | पालघर, ठाणे, मुंबई नगर, मुंबई-उपनगर,रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग |
| २ | पुणे | पश्चिम महाराष्ट्र | ५ | पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर |
| ३ | नाशिक | खानदेश | ५ | नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार, जळगाव |
| ४ | औरंगाबाद | मराठवाडा | ८ | औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर, उस्मनाबाद |
| ५ | अमरावती | विदर्भ | ५ | अमरावती, अकोला,बुलढाणा, यवतमाळ, वाशीम |
| ६ | नागपूर | विदर्भ | ६ | नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली |

# चित्र काढा आणि रंग भरा




## सामान्यज्ञान उत्तरे

१. क
२. अ
३. ब
४. ड
५. क
६. ब
७.अ
८. ड
९. क
१०.ड

श
ब्द
को
डे

७
८
४

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ लो | २ टा | | ३ प | ४ रा | धी | ५ न |
| | ६ गो | वा | | म | | र्गि |
| ७ क | र | | ८ पं | च | वी | स |
| र्ण | | ९ द | | रि | | |
| | १० य | श | वं | त | रा | ११ व |
| १२ अ | शो | क | | मा | | ज्रा |
| | ध | | १३ व | न | वा | स |
| १४ म | रा | ठी | | स | | न |

।। १ तू ही निरंकार ।।

**कृपावंत तू होसी ज्यावर त्याच्या जीवनी येई बहार।**
**कृपावंत तू होसी ज्यावर त्याची कधी ना होई हार।**
**कृपावंत तू होसी ज्यावर पूजील त्याला हा संसार।**
**कृपावंत तू होसी ज्यावर होईल त्याचा जयजयकार।**



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

सर्वांसाठी... सर्वकाही...
एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची
खास सोय।



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

**मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते**

गुरु के दर्शन भक्तजनों को आनंद से भर देते है। गुरु के दर्शन मन की सारी दुविधा को हर लेते है।
गुरु के दर्शन जन्म जन्म के सोये भाग जगाते हैं। गुरु के दर्शन जो करते हैं धन धन वो हो जाते हैं।

**सद्गुरु होता जग का दाता जो चाहे कर सकता है**
**पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है**

१९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2019-2021
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2019
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

